महाराष्ट्र शासनाचा २००५–२००६ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी सोमवार, दिनांक २१ मार्च २००५ रोजी
केलेले भाषण

## भाग पहिला

महोदय,

मी आपल्या अनुमतीने सन २००५-०६ या वर्षाचा राज्याचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे. महाराष्ट्रातील सुजाण जनतेने लोकशाही आघाडी सरकारवर विश्वास ठेवून पुन्हा निवडून दिले आहे. त्याबद्दल जनतेचे शतशः आभार मानून मी अर्थसंकल्पाकडे वळतो.

**राज्याच्या आर्थिक स्थितीतील लक्षणीय बदल.**

२. सन १९९९ मध्ये मी वित्तमंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर काही कालावधीतच, राज्य शासनाला भेडसावणाऱ्या आर्थिक असंतुलनाच्या बाबी श्वेतपत्रिकेद्वारे राज्य विधानमंडळाला आणि महाराष्ट्राच्या जनतेला सादर केलेल्या होत्या. त्यावेळी मी राज्यातील आर्थिक असंतुलनावर पाच वर्षात नियंत्रण आणण्याचा निर्धार जाहीर केला होता. या महनीय सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना सांगतांना मला आनंद वाटतो की, मागील सुमारे दहा वर्ष कालावधीसाठीच्या आर्थिक अस्थैर्यामधून महाराष्ट्र आता पूर्ण सामर्थ्याने बाहेर पडला आहे.

**राज्याच्या अर्थव्यवस्थेचा वाढता विकास दर.**

३. महाराष्ट्र राज्य आर्थिक संकटातून जात असतानासुध्दा वित्त मंत्री या नात्याने मला नेहमीच असा विश्वास होता की, महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या वाढीचा दर पूर्ववत सदृढ अवस्थेत पोहोचल्यानंतर राज्याला भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या आपोआपच नाहीशा होतील. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने मी माझी कर आकारणी विषयक आणि खर्च विषयक धोरणे

वेळोवेळी निश्चित केलेली आहेत. अध्यक्ष महोदय, या सभागृहाला अशी माहिती देण्यास मला आनंद होत आहे की, मागील काही वर्षांत महाराष्ट्र राज्यामध्ये भीषण दुष्काळी परिस्थिती असून सुध्दा आणि या दुष्काळी परिस्थितीमुळे परिणामी राज्याच्या प्राथमिक क्षेत्रातील वाढ खुंटली असताना सुध्दा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेने आपले पूर्वीचे सुदृढ स्वरुप प्राप्त केलेले आहे. प्राथमिक अंदाजावरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्याचे ढोबळ उत्पन्न सन २००२-०३ या वर्षी चालू किंमतीनुसार १०.७ टक्क्यांनी वाढले होते. सन २००३-०४ या वर्षीची अनुषंगिक आकडेवारी अनुक्रमे ७.३ टक्के आणि १२.७ टक्के एवढी होती. सन २००४-०५ चे प्राथमिक अंदाज असे दर्शवितात की, महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत स्थिर किंमतीनुसार ७ टक्क्यांनी आणि चालू किंमतीनुसार १३.८ टक्क्यांनी वाढ अपेक्षित आहे. या पुढेही राज्याच्या अर्थ व्यवस्थेला उज्वल भवितव्य प्राप्त होईल, अशी आर्थिक धोरणे अंमलात आणण्याचा राज्य शासनाचा जाणिवपुर्वक प्रयत्न राहील. भावी कालावधीत राज्याच्या अर्थव्यवस्थेला उज्वल भवितव्य प्राप्त करुन देणाऱ्या अर्थसंकल्पीय धोरणांचा उल्लेख मी या भाषणात पुढे व्यक्त करणार आहे.

**सन २००५-०६ च्या अंदाजानुसार महसुली आधिक्य.**

४. मोठ्या प्रमाणातील महसुली तूट हे मागील सुमारे दहा वर्षे कालावधीत महाराष्ट्राला तापदायक ठरलेल्या आर्थिक अरिष्टामागचे महत्वाचे कारण आहे. अर्थसंकल्प २००४-०५ मध्ये रुपये ९,७५१ कोटीची महसुल तुट दर्शविण्यात आली होती. सन २००४-०५ च्या महसुली अंदाजाप्रमाणे रुपये ९,११५ कोटीवर आता अंदाजित करण्यात आले आहे. या सन्माननीय सभागृहाला असे सांगतांना मला खूप आनंद होत आहे की, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आता सुधारली असून सन १९९३-९४

नंतर प्रथमच सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये रुपये २६५ कोटींचे महसूली आधिक्य दिसून येत आहे. मागील वीस वर्षांच्या कालावधीत केवळ दोनदा (सन १९८७-८८ आणि १९९४-९५) महाराष्ट्राला महसुली आधिक्य प्राप्त झाले होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर या महसुली अधिक्याचे महत्व आपल्या लक्षात येईल.

**कर संकलनात लक्षणीय वाढ.**

**५.** राज्याची आर्थिक स्थिती मागील तीन वर्षाच्या कालावधीत सुदृढ आर्थिक वाढीमुळे राज्याच्या कर वसुलीत झालेली लक्षणिय वाढ तसेच या शासनाने अवलंबलेल्या समर्पक कर आकारणी विषयक धोरणांमुळे झाली आहे.अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे सन २००४-०५ या वर्षासाठी महसुली जमा रक्कम रुपये ४०,३९४ कोटी इतके अंदाजित करण्यात आले आहेत. सन २००४-०५ च्या सुधारित अंदाजाप्रमाणे ह्याचे अंदाज आता रुपये ४२,८८३ कोटी इतके आहे. सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात यांचे अंदाज रुपये ५०,४३० कोटी पर्यंत वाढीव स्तरावर जाण्याचे अंदाजित आहे. ही वाढ प्रामख्याने सन २००३-०४ च्या तुलनेत सन २००४-०५ च्या करवसुलीतील २०.६५ टक्के वाढीमुळे झाली आहे. सन २००४-०५ च्या सुधारित अंदाजावर २००५-०६ ची अंदाजित वाढ ही १७.६० टक्के इतकी रहाणार आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या वृध्दीच्या दरापेक्षा कर वसुलीच्या दरातील वाढ अधिक गतिशीलतेने होत आहे. उच्च स्तरावरील अर्थव्यवस्थेतील तरलता (Liquidity) ही मोठ्या समाधानाची बाब आहे.

**योजनाबाह्य खर्चावर नियंत्रण.**

**६.** या व्यतिरिक्त महसुली शिलकीतील सुधारणांमागील प्रमुख कारण हे योजनेतर खर्चामधील वाढ नियंत्रणात ठेवण्यात आली आहे आणि वेतन, सेवानिवृत्ती वेतन, व्याज प्रदान

यावरील खर्च आता सिमित ठेवण्यात आलेला आहे. या आघाडी शासनाने सन १९९९-२००० या वर्षी राज्याची सुत्रे स्विकारल्यानंतर वेतन, सेवानिवृत्ती वेतन आणि व्याजावरील खर्च राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या ८१ टक्के एवढा होता. सन २००४-०५ च्या सुधारित अंदाजानुसार वेतन, सेवानिवृत्ती वेतन व व्याजावरील खर्च महसुली उत्पन्नाच्या अंदाजे ७० टक्के आहे. तथापी, सन २००५-०६ या वर्षी आता सदर खर्च महसुली उत्पन्नाच्या ६७ टक्के एवढा अंदाजित करण्यात आला आहे. जर महाराष्ट्र राज्याला समाधानकारक राजकोषीय स्थितीत पोहोचायचे असेल तर या शिर्षाखालील खर्चावर अत्यंत काटेकोरपणे नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**वार्षिक योजनेची (२००५-०६) अर्थसंकल्पात पूर्ण तरतूद.**

७. राज्याची महसूली तुट दूर होऊन महाराष्ट्र महसूली शिलकीत आल्यामुळे, राज्याने काढलेल्या कर्जाचा वापर मुख्यत: भांडवली आणि योजनांतर्गत खर्चासाठी करण्यात येणार आहे. आता शासनाला योजनांतर्गत आणि भांडवली स्वरुपाच्या खर्चासाठी अर्थसंकल्पबाह्य कर्जांवर अवलंबून रहावे लागणार नाही. दीर्घ कालावधीनंतर, सन २००५-०६ चा संपूर्ण योजनांतर्गत खर्च अर्थसंकल्पीत करण्याचे मी प्रस्तावित केलेले आहे. यावरुन असे ध्वनित होते की, राज्य योजनांवरील सर्व खर्च संपूर्णपणे अर्थसंकल्पीत साधनसंपत्तीमधून भागविला जाणार आहे. योजनांतर्गत नियतव्यय हे अर्थसंकल्पीत करण्यात येत असल्याने कोअर व बिगर कोअर कार्यामधील फरकाचे औचित्य आता राहिलेले नाही.

**राज्यकोषिय तूट कमी करणे.**

८. आम्हाला आता अर्थसंकल्पबाह्य कर्ज उभारणीचा अवलंब करावा लागणार नाही या बरोबरच राज्याच्या आर्थिक तुटीमध्ये (Fiscal deficit) सुध्दा घट होत आहे हे राज्याची अर्थव्यवस्था

मजबूत होत असल्याचे लक्षण आहे. २००५-०६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्याच्या आर्थिक तुट ढोबळ उत्पन्नाच्या सुमारे २.०९ टक्के (रुपये ८,८५३ कोटी) एवढीच असेल. सन २००३-०४ (प्रत्यक्ष) व सन २००४-०५ (सुधारित अंदाज) ची ही आकडेवारी अनुक्रमे ४.५९ टक्के आणि ३.५६ टक्के होती. राज्यकोषिय तूटीचे प्रमाण कमी करण्यात येत असल्याने शासनाच्या ऋण संग्रहाच्या वृध्दीचा वेग कमी व्हावयास सुरुवात झालेली आहे. महाराष्ट्राच्या कर्जाबाबतचे सार्वजनिक विचारमंथन हे अर्थव्यवस्थेच्या ते फेडण्याबाबतच्या सामर्थ्याचा विचार न करता निव्वळ आकारमानाभोवती केंद्रीकृत झाले आहे. ऋणमानाचे आकारमान जेव्हा मोठे होते तेव्हा सुध्दा महाराष्ट्र हे थोडक्या राज्यांपैकी एक होते, जेथे राज्याचे स्थूल उत्पन्नाचे कर्जाशी असलेले प्रमाण हे राजकोषीय तूटीतील घटीसह ३० टक्क्यांपेक्षा कमी राहिलेले आहे. या आकडेवारीतील घसरण जरी मंदगतीची असली तरी नोंद घेण्याजोगी आहे.

**गुंतवणूक-दारांचा विश्वास संपादन करण्यासाठी संस्थात्मक चौकट.**

९. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वाढीच्या वरच्या टप्प्यात पोहोचली असली तरी हे ध्यानात ठेवणे महत्वाचे आहे की, अर्थव्यवस्था वाढ व घटाच्या विशिष्ट चक्रातूनच जात असतात. म्हणून मागील काही कालावधीत महाराष्ट्राला ज्या कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागले अशा परिस्थितीपासुन अर्थव्यवस्था संरक्षित राहील अशी खबरदारी घेणे आवश्यक झाले आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुस्थिर आणि संघटीत होताना आम्हाला जाणिवपूर्वक असे वातावरण आणि संस्थात्मक चौकट निर्माण करावी लागेल की, कठीण आर्थिक परिस्थितीवर मात करण्याची क्षमता राज्य शासनाकडे आहे अशाप्रकारचा कायमचा विश्वास सर्व गुंतवणूकदारांमध्ये निर्माण होईल.

**दायित्वांच्या व्यवस्थापना-करिता न्यास.** १०. उपरोक्त मनोदय विचारात घेऊनच वित्तीय संस्था आणि अशासकीय उपक्रम यांच्या संबंधिच्या राज्य शासनाच्या आर्थिक दायित्वाचे व्यवस्थापन करण्यासाठी शासनाने एक न्यास (Trust) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर न्यासाचा आकृतीबंध लवकरच निश्चित करण्यात येत आहे. सदर व्यवस्था दिनांक ३० जून २००५ पूर्वी कार्यान्वित होईल. तद्नुसार अर्थसंकल्पबाह्य कर्जाची परतफेड, दुर्धर अवस्थेमधील शासनाच्या मत्ता (Distressed assets) आणि भावी काळातील दिल्या जाणाऱ्या शासन हमी यांचे व्यवस्थापन करण्यासाठी तीन स्वतंत्र निधी स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे. ही व्यवस्था व्यावसायिक पध्दतीने राबविली जावी यादृष्टीने आघाडीवरच्या वित्तीय संस्थांकडे त्याचे व्यवस्थापन सोपविले जाईल. महाराष्ट्राच्या वित्तीय व्यवस्थेला प्रलंबित दायित्वातून मुक्त करण्यासाठी सन २००५-०६ मध्ये या प्रयोजनासाठी सुमारे रुपये ३,००० कोटी इतका निधी उपलब्ध करण्याबाबत मी प्रस्तावित करीत आहे. याच प्रमाणावरील तरतूदी येत्या तीन वर्षात करण्याचे मी योजिले आहे. अर्थसंकल्पबाह्य कर्जात पुढील कोणतीही वाढ होऊ न देता तीन वर्षाच्या कालावधीत ५० टक्के अर्थसंकल्प बाह्य कर्जाची परतफेड करण्याचे मी ठरविले आहे.

**आर्थिक जबाबदारी-विषयक विधेयक.** ११. राज्य विधानमंडळाच्या चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये, आर्थिक जबाबदारी विषयक एक नवीन विधेयक सादर करण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. सदर आर्थिक जबाबदारी विषयक विधेयकाच्या चौकटीत राहून राज्य शासनाला आपले निर्णय जबाबदारीने घ्यावे लागतील. केंद्र शासनाने स्विकारलेल्या १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्य शासनांनी काही किमान निर्बंधांसह अशाप्रकारचे विधेयक मंजूर

करुन घेणे बंधनकारक आहे असे विधेयक मंजूर केल्यासच व्याज आणि कर्जातील सूट राज्यास मिळू शकते. सदर विधेयक मंजूर झाल्यानंतर राज्य शासनांना प्राप्त होणारे आर्थिक सहाय्य हे भावी प्रभावाने मंजूर होणार असल्यामुळे मी या सभागृहाच्या सदस्यांना अशी विनंती करीत आहे की, त्यांनी राज्य शासनाचे प्रस्तावित विधेयक तातडीने मंजूर करुन देण्यासाठी सहकार्य करावे. आर्थिक जबाबदारी विषयक विधेयक मी लवकरच या सदनात मांडणार आहे.

**विभागांना विधीचे मासिक वितरण.**

१२. अर्थसंकल्प व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने मी मासिक निधी वितरणाची पध्दत प्रस्तावित करीत आहे. मासिक उत्पन्न आणि खर्च निश्चित करण्याबाबत वित्त विभागाने यापूर्वीच शासनाच्या सर्वच विभागांना कळविले आहे. या पध्दतीमुळे मान्यताप्राप्त खर्चासाठी शासनाच्या कोषागारातून निधी काढण्याची कार्यवाही स्वयंचलीत राहील. वित्त विभाग काही महत्त्वाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीवर नियंत्रण ठेवेल व उत्पन्न आणि खर्च याचा दैनंदिन मेळ राहील याकडे लक्ष देईल. यामुळे विभागांना त्यांच्या कार्यक्रमांचे आणि निधी वितरणाचे सखोल नियोजन करावे लागेल. अशी उपाययोजना आर्थिक शिस्त आणण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. वित्त विभाग निधी उपलब्धतेच्या/ निधी वाटपाच्या कार्यवाहीचे संनियंत्रण करेल आणि शासकीय विभागांच्या प्रकल्पामधील लक्षणीय स्वरुपाच्या विसंगती/ त्रुटी बाबत त्या विभागांना मार्गदर्शन करेल. प्रत्येक विभागाद्वारे आवश्यक मासिक निधीची माहिती चालू अधिवेशनामध्येच विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल. चालू वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाबाबत याद्वारे अधिक विश्वास निर्माण होईल.

**सरासरी व्याज दरात घट.** १३.१. राज्याच्या आर्थिक प्रगतीचा दर आणि राज्याच्या कर्जावरील व्याजाचा दर यांचे तुलनात्मक चित्र हे राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याचे लक्षण आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा दर वाढत असतांनाही, राज्याच्या कर्ज रकमांवरील व्याजाचा सरासरी दर कमी करण्यासाठी राज्य शासनाने मागील काही वर्षात केलेले प्रयत्न ही राज्याच्या वित्त व्यवस्थापनाची एक महत्वाची बाब आहे. राज्य शासनाला यात बरेच यश प्राप्त झाले आहे. राज्य शासनाच्या कर्जावरील व्याजाचा सरासरी दर प्रती वर्षी १२.७० टक्के वरुन सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ९.७७ टक्के पर्यंत कमी करण्यात आली आहे. सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये हा व्याजचा दर ९.३३ टक्के एवढा अंदाजित केलेला आहे. तथापि या व्याज दराच्या अंदाजामध्ये १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या परिणामी प्राप्त होणारी कर्ज आणि व्याज विषयक सूट (अंदाजे रुपये ७०० कोटी प्रतिवर्षी) विचारात घेण्यात आलेली नाही. या व्यतिरिक्त राज्य शासनाने नाबार्डच्या कर्जाची पुनर्रचना केली असून, त्यामुळे सुध्दा राज्य शासनाच्या कर्जांची सरासरी किंमत आणखी कमी होईल. उर्वरित जादा दराची कर्जे कमी दराच्या कर्जांमध्ये रुपांतरित करुन तसेच कमी दरांच्या कर्जाचा वापर करुन, राज्यावरील कर्जाचा सरासरी खर्च कमी करण्याचा मी जाणिवपूर्वक प्रयत्न करणार आहे. वित्तीय संस्थांची इतर शिल्लक दायित्वे आम्ही वाटाघाटीने परतफेड करीत आहोत. नाबार्ड राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC), हुडको यांची थकीत दायत्वे पुनर्रचीत करण्याचा व परतफेड करण्याचा आमचा जाणीवपूर्वक प्रयत्न राहील.

**१३.२.** राज्य शासनाच्या आर्थिक व्यवस्थापनातील या यशाची नोंद वित्तीय आणि बँकींग संस्थांकडून घेतली जाईल आणि त्यानुसार वित्तीय आणि बँकिंग संस्था राज्य शासनाच्या नवीन कर्जावरील व्याजाचा दर कमी करतील अशी मला खात्री आहे.

**बाराव्या वित्त आयोगाचा अहवाल.**

**१४.१.** भारतीय घटनेच्या २८० व्या कलमानुसार गठित केलेल्या बाराव्या वित्त आयोगाने आपला अहवाल माननीय राष्ट्रपतींना सादर केला आहे. हा अहवाल भारत सरकारने मंजूर केला असून २००५ ते २०१० या कालावधीत राज्याला अंदाजे रुपये ३६,१९४.२४ कोटी एवढा निधी मिळणार आहे.

**१४.२.** वित्त आयोगाने केंद्राच्या कर व शुल्कातील ३०.५० टक्के हिस्सा सर्व राज्यांचा देण्याची शिफारस केली आहे. १ एप्रिल २००५ पासून पुढील पाच वर्षात राज्यास केंद्राच्या करातील हिस्सा म्हणून रुपये ३०,६६३.१९ कोटी एवढी रक्कम मिळणार आहे.

**शासकीय उपक्रमांची आर्थिक पुनर्रचना.**

**१५.१.** नवीन आर्थिक परिस्थितीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या बऱ्याचश्या सार्वजनिक उपक्रमांचे सामाजिक महत्व नष्ट झालेले आहे. किंबहूना त्यापैकी बऱ्याचश्या उपक्रमांमुळे राज्य शासनावर केवळ आर्थिक भारच पडलेला आहे. या समस्येला तोंड देण्यासाठी काही वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळाची स्थापना करण्यांत आली होती. सर्वसाधारणपणे शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीमध्ये सार्वजनिक उपक्रम बंद करण्याच्या कार्यवाहीस होणारा विलंब विचारात घेऊन त्यादृष्टीने सार्वजनिक उपक्रम बंद करण्याबाबत परिणामकारक आणि तातडीची उपाययोजना करण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक सदर मंडळाची स्थापना राज्य शासनाच्या कक्षेबाहेर

करण्यांत आली होती आणि त्या मंडळाला व्यापक स्वरुपाचे अधिकार देण्यांत आले होते. तथापि, शासनाचा हा प्रयोग तेवढासा यशस्वी झाला नाही. म्हणून या समस्येवर मार्ग काढण्यासाठी इतर पर्यायांचा विचार करणे आवश्यक झाले आहे. म्हणून मी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाकडे महाराष्ट्र सार्वजनिक उपक्रमांची पुनर्रचना करण्याचे कार्य एजन्सी तत्वावर देण्याचे प्रस्तावित करीत आहे. सन्माननीय सदस्यांना याची माहिती आहे की, तोटयात चालणाऱ्या व्यवसायाच्या पुनर्रचनेसाठी लागणारे आवश्यक अनुभव महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाकडे असल्यामुळे पुनर्रचनेचे काम या महामंडळाकडे सोपविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. वित्त विभागाच्या थेट नियंत्रणाखाली पुनर्रचनेची ही कार्यवाही करण्यात येईल.

१५.२. केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमांप्रमाणे आम्हाला आमच्या फायद्यात असलेल्या उपक्रमांकडून कोणताही लाभांश मिळत नाही. या सार्वजनिक उपक्रमांपैकी बरेचशे उपक्रम हे वैधानिक स्वरुपाचे असून, त्यांच्या कायदेशीर रचनेमुळे शासनाला अशा उपक्रमांकडून कोणताही लाभांश प्राप्त होत नाही. म्हणून सदर उपक्रमांचा आढावा घेऊन, त्यांचे वास्तव मुल्य शोधून काढावे लागणार आहे. याची सुरुवात म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे पूर्वीचे वैभवशाली रुप प्राप्त व्हावे तसेच महामंडळास नवरुप धारण करण्यास सहाय्यभूत ठरणाऱ्या बाबींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने पाऊले टाकण्याचे आम्ही ठरवले आहे.

**राज्याचे उत्पन्न.**

**१६.** सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००४-०५ हे प्रकाशन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्रचलित किंमतीनुसार २००३-०४ मध्ये राज्याचे निव्वळ उत्पन्न

रुपये २,९४,००१ कोटी रुपये असून ते २००२-०३ मधील राज्य उत्पन्नापेक्षा १२.७ टक्क्यांनी जास्त होते. सन २००३-०४ मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न अंदाजे २९,२०४ रुपयापर्यंत वाढले आहे.

किंमत निर्देशांक.

**१७.** अखिल भारतीय घाऊक किंमतीच्या निर्देशांकावर आधारित वार्षिक चलन वाढीचा दर जानेवारी २००५ करिता ५.५ टक्के इतका होता. हा दर जानेवारी २००४ साठी ६.५ टक्के इतका होता. अखिल भारतीय घाऊक सरासरी किंमतीच्या निर्देशांकावर आधारित चलन वाढीचा दर एप्रिल २००४ ते जानेवारी २००५ या कालावधीकरिता ६.७ टक्के इतका आहे. तो आधीच्या वर्षात तत्सम कालावधीकरिता ५.५ टक्के इतका होता.

र्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ.

**१८.** केंद्र शासनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ मंजूर केली आहे. हे लक्षात घेता शासनाने शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या व निवृत्ती वेतनधारकांच्या महागाई भत्त्यात १ एप्रिल २००५ पासून ३ टक्के वाढ देण्याचे मान्य केले आहे, हे सांगताना मला आनंद होतो.

वार्षिक योजना ५-०६.

**१९.** राज्याची सन २००५-०६ ची रुपये १०,५८६ कोटीची प्रारुप वार्षिक योजना, योजना आयोगास सादर करण्यात आली होती. योजना आयोगाने त्यामध्ये वाढ करुन वार्षिक योजना २००५-०६ चे आकारमान रुपये ११,००० कोटी निश्चित केले आहे. त्यानुसार सन २००५-०६ ची वार्षिक योजना रुपये ११,००० कोटीची आहे. या योजनेमध्ये सामाजिक व सामूहिक सेवा, जलसंपदा व पूरनियंत्रण, वाहतूक व दळणवळण या क्षेत्रांकरीता प्राधान्याने नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला

आहे. सन २००५-०६ च्या वार्षिक योजनेतील प्रस्तावित नियतव्यय राज्याच्या साधनसंपत्तीशी निगडीत असल्यामुळे ही योजना वास्तववादी आहे.

**अनुशेष.** **२०.** पाटबंधारे विकास क्षेत्र वगळता, अन्य विकास क्षेत्रातील दिनांक १ एप्रिल २००५ रोजीचा अनुशेष रुपये ३८८०.२४ कोटी एवढा आहे. वार्षिक योजना २००५-०६ मध्ये पाटबंधारे विकास क्षेत्र वगळता इतर विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी खास रुपये १४०० कोटी इतका नियतव्यय ठेवण्यात आला आहे. डिसेंबर २००४ च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात मी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने मा. राज्यपालांच्या निदेशानुसार अनुशेष दूर करण्यासाठी उपलब्ध होणा-या नियतव्ययापैकी वितरीत तरतूद व प्रत्यक्ष खर्च याबाबतचा आढावा घेण्यासाठी व त्या अनुषंगाने पुढील उपाय योजना करण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती दर तीन महिन्यांनी आढावा घेणार आहे.

**महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्प.** **२१.** महाराष्ट्र शासन हे राज्यातील जनतेला आरोग्य सेवा पुरविण्यामध्ये नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे. राज्यातील द्वितीय स्तर रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा गुणात्मक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने शासनाने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने सन १९९८-९९ पासून महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाची सुधारित किंमत रुपये ६५० कोटी असून डिसेंबर २००४ अखेर एकूण रुपये ४५७ कोटी इतका खर्च झाला आहे. सदर प्रकल्पांतर्गत ७६ ग्रामीण रुग्णालयांचे, ५० व १०० खाटांच्या रुग्णालयांत श्रेणीवर्धन करण्यात आले आहे. या शिवाय २५ जिल्हा रुग्णालये व ३५ ग्रामीण रुग्णालयांच्या इमारतींचे नूतनीकरण व विस्तारीकरण

करण्यात येत आहे. या प्रकल्पाकरिता सन २००५-०६ या वर्षाकरिता रुपये १२२.४२ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**विभागीय संदर्भ सेवा केंद्रांची नाशिक व अमरावती येथे स्थापना.**

**२२.** महसुली विभागीय मुख्यालयी अतिविशेषज्ञ आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने संदर्भसेवा रुग्णालये स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यानुसार प्रथम टप्प्यामध्ये नाशिक व अमरावती येथे ही अतिविशेषज्ञ सेवा रुग्णालये सुरु करावयाची आहेत. नाशिक येथे संदर्भ सेवा रुग्णालय प्रकल्पाच्या इमारतीपैकी मुख्य इमारतीचे ९० टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे. दुसरे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे सुरु करण्यास शासनाने मंजुरी दिलेली असून त्यानुसार बांधकामास सुरुवात करण्यात आलेली आहे. सन २००४-०५ मध्ये या योजनेसाठी रुपये ५.८० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करण्यात आला आहे. सन २००५-०६ मध्ये या योजनेसाठी रुपये ७ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**आदिवासी उप योजना-आरोग्य योजना.**

**२३.** राज्यात आदिवासी योजनेअंतर्गत विशेषत: आदिवासी भागामधील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठीच्या उपाय योजनेमध्ये पाडयापाडयात स्वयंसेवकांची नेमणुक, रेस्क्यु कॅम्पची स्थापना, गर्भवती स्त्रियांना मातृत्व अनुदान, दायी सभा, पेडियाट्रीक अतिदक्षता कक्षाची स्थापना इत्यादी योजना राबविण्यांत येतात. त्यामुळे या भागातील बालमृत्यूचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून आले आहे. सन २००४-०५ मध्ये या योजनेसाठी रुपये १९.०५ कोटीची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. सन २००५-०६ मध्ये या योजनेसाठी रुपये २८.८० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रम.** २४. हिवतापाच्या प्रादुर्भावास आळा घालण्यासाठी राज्य योजनेत राज्य हिश्श्यापोटी रुपये ११.०९ कोटी इतकी तरतूद २००४-०५ मध्ये प्रस्तावित केलेली आहे. याशिवाय जागतिक बँकेकडून हिवताप नियंत्रण सोसायटीला परस्पर अर्थसहाय्य पुरविण्यात येते. हिवतापाचा प्रार्दुभाव कमी होण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे हिवतापाचे प्रमाण सातत्याने कमी होत आहे. तसेच सन २००५-०६ मध्ये या योजनेसाठी रुपये २२.७१ कोटीं इतकी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आली आहे.

**एड्स नियंत्रण कार्यक्रम.** २५. एड्स या रोगाचा वाढता प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने प्रकल्प राबविण्यात येत आहे. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी १९९८-९९ मध्ये एड्स नियंत्रण सोसायटीची स्थापना करण्यात आलेली आहे. या सोसायटीला सन २००४-०५ मध्ये राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेकडुन रुपये १४ कोटी इतके अर्थसहाय्य उपलब्ध झाले आहे. सन २००५-०६ साठी रुपये ३७.५९ कोटींचा प्रस्ताव सादर झाला आहे.

**जीवनदायी आरोग्य योजना.** २६. राज्यातील दारिद्रय रेषेखालील लोकांना गंभीर आजारावर खर्चिक उपचार व शस्त्रक्रिया करुन घेण्यासाठी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे दारिद्रय रेषेखालील लोकांना हृदय विकार, मुत्रपिंड रोपण, मेंदू व मज्जासंस्थेच्या विकारावरील आवश्यक असलेल्या उपचारासाठी प्रतिरुग्ण कमाल रुपये ७०,००० इतके अर्थसहाय्य देण्यात येते. त्याचा फायदा ८७२ इतक्या लाभार्थ्यांना झाला आहे. सन २००५-०६ मध्ये या योजनेसाठी रुपये ७ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**कुटुंब कल्याण कार्यक्रम.** **२७.** कुटुंब कल्याण कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग वाढविण्यासाठी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया स्विकार्त्यांसाठी शासनाने यापूर्वीच रुपये ५०१ इतका मोबदला द्यावयास सुरुवात केली आहे. त्यामुळे पुरुष नसबंदी शस्त्रक्रियामध्ये वाढ दिसून येत आहे. एकूण नसबंदी शस्त्रक्रियांची तुलना करता, पुरुष नसबंदी शस्त्रक्रियांची टक्केवारी सन १९९९-२००० च्या ०.८९ वरुन २००३-०४ साली ६.०८ वर गेली आहे.

**विशेष कुटुंब कल्याण मोहिम.** **२८.** सर्वांच्या विकासासाठी व कुटुंबाच्या सुखासाठी ही संकल्पना स्विकारुन कुटुंब कल्याण कार्यक्रम अधिक गतीमान करण्यासाठी राज्य शासनाने दिनांक १ जानेवारी २००५ ते दिनांक ३१ मार्च २००५ या कालावधीसाठी कुटुंब कल्याण धडक मोहिम राबविण्याचे ठरविले आहे. या मोहिमेत कुटुंब कल्याण कार्यक्रमाशी संबधित असलेल्या विविध आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. शुभारंभ माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक १ जानेवारी २००५ रोजी पुणे येथे केला आहे. सन २००४-०५ मध्ये ७.६८ लक्ष शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट पूर्ण करावयाचे आहे.

**सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना.** **२९.** सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेखाली एक अथवा दोन मुलींच्या जन्मानंतर मुलगा नसतांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना दीर्घ मुदतीची मुदत ठेव देण्याचे प्रलंबित होते. शासन सदर प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करीत आहे. सन २००४-०५ मध्ये रुपये ५.५० कोटी खर्च झाला आहे आणि सन २००५-०६ या वर्षाकरिता रुपये २.५० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**महिला आरोग्य दिन.** **३०.** भारतातील पहिल्या महिला डॉक्टर कै. आनंदीबाई गोपाळ जोशी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिनांक २६ फेब्रुवारी हा दिवस राज्यामध्ये महिला आरोग्य दिन म्हणून साजरा करण्यात येणार

असून त्या दिवशी राज्यस्तर, जिल्हास्तर व विविध स्तरावर स्त्रियांशी संबंधित आरोग्य प्रश्नावर कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. विभागाने महिला आरोग्य कर्मचारी व पदाधिकारी यांना त्यांनी आरोग्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल पारितोषिक देण्याचे योजिले आहे. सन २००५-०६ या वर्षाकरिता रुपये ५० लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना.** **३१.** ही योजना सन २००३-०४ मध्ये सुरु करण्यात आली असून गेल्या दोन वर्षात राज्यातील सुमारे २.१८ कोटी विद्यार्थ्यांना सुरक्षा कवच देण्यात आले आहे. या विम्याच्या हप्त्यापोटी २००४-०५ मध्ये रुपये २.७० कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे व सन २००५-०६ करिता रुपये २.७० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**सर्व शिक्षण मोहिम.** **३२.** चालू पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राज्याकरिता या योजनेसाठी आतापर्यंत रुपये २,०४४.२४ कोटीचा प्रकल्प केंद्र शासनाने मंजूर केला असून त्याकरिता केंद्र शासनाने आतापर्यंत रुपये ५६४.०६ कोटी इतका निधी मुक्त केला असून राज्य शासनाने राज्यहिश्याकरिता रुपये ३४३.५३ कोटी एवढी तरतूद मंजूर केली आहे. या योजनेवर आतापर्यंत एकूण रुपये ६७४.८० कोटी एवढा खर्च झाला आहे.

**वस्ती शाळा.** **३३.** वस्ती शाळा योजनेअंतर्गत राज्यात आतापर्यंत सुमारे ८,३९८ वस्ती शाळा सुरु झालेल्या असून त्यामधून सुमारे १.८६ लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**शालेय पोषण आहार योजना.** **३४.** केंद्र शासनाने राज्यातील सुमारे ९७ लक्ष विद्यार्थ्यांना प्रोटीनयुक्त शिजविलेले अन्न देण्यासाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रुपये १ या प्रमाणे रुपये १३८ कोटी इतके अनुदान मंजूर केले

असून सदर योजनेत राज्य शासनाकडून अन्न शिजविण्यावरील खर्चाकरिता प्रति विद्यार्थी प्रतीदिन ५० पैसे एवढे अनुदान देण्यात येते. या योजनेकरिता सन २००५-०६ करिता रुपये १५९.०७ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**नवीन माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा / तुकडयांना अनुदान.**

**३५.** चालू पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राज्यातील ८५० माध्यमिक शाळा, १,७३३ माध्यमिक शाळातील तुकड्या व १,४९९ उच्च माध्यमिक शाळातील तुकड्या, शासनाने पुरेशी तरतूद उपलब्ध करुन देऊन अनुदानावर आणल्या आहेत. सन २००५-०६ या वर्षाकरिता रुपये १४०.९४ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**मुक्त शाळा.**

**३६.** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्टय साध्य करण्यासाठी तसेच प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमुळे प्राथमिक स्तरावरुन माध्यमिक स्तरावर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. असे असले तरीही विविध योजना व विभागाचे प्रयत्न असुनही उच्च प्राथमिक स्तरावर मुलींच्याबाबतीत सुमारे २६ टक्के व अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांच्याबाबत सुमारे ४० टक्के एवढे गळतीचे प्रमाण आहे. या विद्यार्थ्यांना औपचारिक शाळेत जाऊन शिक्षण घेणे आर्थिक परिस्थितीमुळे शक्य होत नाही. अशा विद्यार्थ्यांना अनौपचारिक शिक्षण देण्यासाठी व त्यांना माध्यमिक शालांत परीक्षेला बसण्यासाठी राज्यात मुक्त शाळा योजनेअंतर्गत केंद्रे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. या केंद्रातील विद्यार्थी त्यांना जड वाटणाऱ्या नेहमीच्या गणित व इंग्रजी या विषयांऐवजी व्यावसायिक शिक्षणाचा त्यांच्या आवडीचा विषय घेऊ शकतील. या केंद्रातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणामुळे रोजगार व स्वयंरोजगारासाठी फायदा होऊ शकेल.

**महाविद्यालयीन शैक्षणिक शुल्क.** ३७. सर्व स्तरावरील शिक्षण क्षेत्रावर सर्वांचेच लक्ष केंद्रीत होते. राज्य शासन प्रतिवर्षी शिक्षणावर रुपये ९,००० कोटीपेक्षा जास्त रक्कम खर्च करीत असून सुध्दा शैक्षणिक संस्थांमधील सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी तसेच राज्यात नवीन शैक्षणिक संस्था स्थापन करण्यासाठी अतिरिक्त साधन संपत्तीची नेहमीच गरज भासत आहे. ज्या शासन अनुदानित महाविद्यालयांमधील विद्यार्थी सधन कुटूंबामधील आहेत आणि ज्यांना शैक्षणिक शुल्कासाठी शासनाच्या अर्थसहाय्याची प्रत्यक्षात गरज नाही अशा सर्व शासन अनुदानित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना देखील मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य देण्यात येते. ही विसंगती दूर करण्यासाठी आणि शैक्षणिक संस्थांच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने सर्व शासन अनुदानित महाविद्यालयांमध्ये त्रिस्तरीय शैक्षणिक शुल्क पध्दत लागू करण्याचे आम्ही ठरविले आहे. सध्याचे अनुदानित शैक्षणिक शुल्क किंवा प्रत्यक्ष खर्चावर आधारित अर्धे शैक्षणिक शुल्क किंवा संपूर्ण शैक्षणिक शुल्क या पैकी एक विकल्प महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देण्याचे प्रस्तावित करीत आहे. शैक्षणिक शुल्क भरण्याबाबत प्रस्तावित केलेला विकल्प हा प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थ्याला प्रवेशाच्या वेळी द्यावा लागेल आणि तो स्वेच्छेचा असेल. अशाप्रकारे गोळा होणारे अधिकचे शैक्षणिक शुल्क महाविद्यालयांमधील सुविधांची वाढ करण्यासाठी आणि राज्यामधील शैक्षणिक संस्थांचे जाळे अधिक विस्तृत करण्यासाठी वापरण्यात येईल. अशाप्रकारच्या व्यवस्थेमुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षण संस्थेमधील सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी प्रत्यक्ष आर्थिक सहभाग देण्याची संधी प्राप्त होईल. आयकर अधिनियमात

पाल्यांच्या शिक्षण शुल्कावरील खर्च आयकरातून वजावटीसाठी पात्र असल्याने आयकर दाते या योजनेस निश्चित प्रतिसाद देतील असा मला विश्वास वाटतो.

**शालेय स्तरावर क्रीडेसाठी प्रोत्साहन.**

**३८.** शालेय स्तरावरच क्रीडेसाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टिने माझ्या शासनाने खाजगी शाळांना देय वेतनेतर अनुदान, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना देय सादिल अनुदान आणि सर्व शिक्षा अभियानाखाली देय शाळा अनुदान यातून एक चतुर्थांश खर्च क्रीडा प्रोत्साहनासाठी करण्याचे प्रस्तावित केले आहे. यातून अंदाजे रुपये ४० कोटी क्रीडा प्रयोजनार्थ उपलब्ध होतील. एकुण रुपये १९.५३ कोटीचा उपलब्ध नियतव्यय लक्षात घेता यावर्षी केलेल्या भांडवली तरतुदीतून माझे शासन विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील अपूर्ण संकुलांचे बांधकाम पूर्ण करेल.

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर [illegible]वृत्तीच्या दरामध्ये वाढ.**

**३९.१.** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत असली तरी बांधिल खर्चाइतकी तरतूद राज्य शासनास करावी लागते. चालू पंचवार्षिक योजनेत सदर बांधिल खर्चाची रक्कम रुपये ५७.७८ कोटी इतकी निश्चित करण्यात आली आहे.

**३९.२.** केंद्र शासनाने शिष्यवृत्तीच्या दरात वाढ करुन योजनेमध्येही सुधारणा केली आहे. ही वाढ व सुधारणा दिनांक १ एप्रिल २००३ पासून लागू करण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला असुन, निवासी विद्यार्थ्यांसाठी पुर्वी शिष्यवृत्तीचे दर रुपये १५० ते रुपये ४२५ इतके होते, ते आता रुपये २३५ ते रुपये ७४० इतके केले आहे. त्याचप्रमाणे अनिवासी विद्यार्थ्यांसाठी पुर्वी शिष्यवृत्तीचे दर रुपये ९० ते रुपये १९० इतके होते ते आता रुपये १४० ते रुपये ३३० इतके केले आहे.

वरील प्रयोजनासाठी सन २००४-०५ साठी योजनांतर्गत रुपये ५७ कोटी व योजनेतर रुपये ९८ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तर सन २००५ करिता योजनांतर्गत रुपये ३३ कोटी व योजनेतर रुपये ५७.७८ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे.

**मागासवर्गीयांचा विकास.** **४०.** खालील महामंडळांच्या स्थापनेमागचा हेतू आपणांस निश्चितपणे माहीत आहे :—

(१) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ,

(२) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,

(३) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ,

(४) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,

(५) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ,

(६) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,

(७) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ,

शासनाने या महामंडळांना त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या विविध विकास योजना अंमलात आणणे शक्य व्हावे यासाठी भाग भांडवलाच्या स्वरुपात मोठ्या रकमा मंजूर केलेल्या आहेत. सन २००४-०५ या वर्षी रुपये ९६.६२ कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत तर सन २००५-०६ या वर्षासाठी रुपये ८३.५० कोटी इतकी रक्कम प्रस्तावित आहे.

**खावटी कर्ज.** **४१.** सन २००४-०५ मध्ये रुपये ४१.७३ कोटी एवढया रकमेचे खावटी कर्ज निर्लेखीत करण्यात आले असून त्याचा राज्यातील ८.९८ लक्ष आदिवासींना थेट फायदा झाला आहे. तसेच सन २००४-०५ मध्ये १५ आदिवासी जिल्हयातील २.०१

लक्ष आदिवासी लाभार्थ्यांना रुपये ६०.०२ कोटी इतक्या रकमेचे खावटी कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारण्यास व त्यांच्या जीवनमानात गुणात्मक सुधारणा होण्यास निश्चित मदत झाली आहे.

**आदिवासी महिलांचे सक्षमीकरण.**

**४२.** अनुसूचित जमातीतील आदिवासी महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी ४,६०० स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत विशेष योजना सुरु केलेल्या आहेत. राज्यातील नाशिक, नंदुरबार, ठाणे, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, अमरावती व यवतमाळ या जिल्हयांमधील महिलांकरिता ३ वर्षात ४,६०० स्वयंसहाय बचत गट स्थापन करण्यात येणार असून त्यासाठी रुपये ४.६६ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. या योजनेसाठी सन २००५-०६ या वर्षाकरिता रुपये १.३८ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**निर्वाह भत्त्यात वाढ.**

**४३.** व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असणाऱ्या व शासकीय वसतीगृहात राहणाऱ्या (१) वैद्यकीय अभियांत्रिकी/ कृषी/ पशूवैद्यकीय/ वास्तुशास्त्र (२) अभियांत्रिकी पदविका, एमबीए, एमएसडब्लू (३) बीएड/डीएड इत्यादी अभ्यासक्रमाच्या वसतीगृहात राहणाऱ्या १,५४९ आदिवासी विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्याचा दर रुपये १९० वरुन अनुक्रमे ५०० ते ७०० पर्यंत व वसतीगृहाबाहेर राहणाऱ्या १,५३६ आदिवासी विद्यार्थ्यांनाही निर्वाह भत्ता रुपये ५०० ते १,००० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेकरिता वर्ष २००५-०६ साठी रुपये ८८.५२ लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण सुविधा.**

**४४.** सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच गुणवत्ता असूनही आदिवासी विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा

म्हणून परदेशातील विद्यापीठामध्ये विविध अभ्यासक्रमासाठी प्रतिवर्षी १० विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी पुरस्कृत करण्यात येईल.

**आदिवासी उपयोजना.** **४५.१.** राज्याच्या साधन संपत्तीचे लोकसंख्येच्या आधारे समतोल वाटप करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणानुसार आदिवासी उपयोजनेला वार्षिक राज्य योजनेतून ९ टक्के प्रमाणे रुपये ९९० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या निधीतून अद्याप रस्त्यांने न जोडण्यात आलेली ४३८ गांवे व पाडे आणि १४८ आठमाही रस्ते असलेली गावे व पाडे बारमाही रस्त्यांने जोडणे तसेच ३१४ गांवे व पाड्यांना पिण्याचे शुध्द पाणी पुरविणे तसेच पिण्याच्या पाण्याची अपुरी सोय असलेल्या ६०९ गावे व पाड्यांना कायम स्वरुपी पाणी पुरवठ्याची सोय करणे याबाबतचा समावेश आहे. याशिवाय शिक्षणातील गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच शिक्षणातील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी, नवीन आश्रमशाळा व वसतिगृहे स्थापन करणे, विद्यमान व नवीन अंगणवाड्यांमध्ये ० ते ६ वयोगटातील मुलांची भरती १५ टक्के पर्यंत वाढवून कुपोषणाचे प्रमाण कमी करणे आणि अर्भक मृत्युचा दर कमी करणे व पौंगडावस्थेतील मुलींच्या समस्या, वैयक्तिक आरोग्य आणि पर्यावरण विषयक स्वच्छता अशा बाबींवर विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे.

**४५.२.** सन २००५-०६ या वर्षाकरिता गावे रस्त्याने जोडणे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे या २ कार्यक्रमांतर्गत अंदाजे अनुक्रमे १ लाख व ४ लाख आदिवासींना लाभ मिळणार आहे. त्याच प्रमाणे ५२,६०० आदिवासी विद्यार्थ्यांना नवीन आश्रमशाळा आणि वसतिगृहाद्वारे शिक्षणाचा लाभ मिळणार आहे. आदिवासी मुलींची शिक्षणातील गळती थांबविण्यासाठी प्रोत्साहन भत्ता योजनेसाठी रुपये ३० कोटीची तरतूद करण्यात

आलेली आहे. याचा राज्यातील ४ लाख आदिवासी मुलींना लाभ मिळणार आहे.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना.** **४६.** केंद्र पुरस्कृत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या निकषानुसार ७०० लोकसंख्या असलेल्या आदिवासी भागासाठी नवीन अंगणवाडी केंद्र मंजूर करण्यात येते. या योजनेंतर्गत राज्य शासनाने स्वतःच्या निधीतून एकूण २,८३८ नवीन अंगणवाड्या मंजूर केल्या आहेत. सन २००५-०६ या वर्षामध्ये या योजनेकरिता रुपये ३३.७६ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य मिशन.** **४७.** राज्य शासनाने लहान मुलांमधील कुपोषण व बालमृत्यू या तीव्र समस्यांवर उपाय करण्यासाठी राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन औरंगाबाद येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ० ते ६ वयोगटातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पुढील पाच वर्षे हे मिशन कार्य करेल. गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता तसेच एका वर्षाखालील बालकांचे आरोग्य व पोषण यावर मिशनचे विशेष लक्ष राहील. या मिशनवर महाराष्ट्र शासनाचे सचिव दर्जाचे वरिष्ठ अधिकारी प्रमुख राहतील. या मिशनतर्फे, राज्यातील सर्व शहरे व गावांमध्ये व्यापक प्रसिध्दी मोहिम हाती घेऊन माता व बालकांच्या आरोग्य व पोषणाचे महत्व जाणून समाजाने महिला व बालकांची अधिकाधिक जबाबदारी स्वीकारावी हे या मिशनचे अंतिम ध्येय राहील.

**स्वामिनी प्रकल्प.** **४८.** आधुनिक पणन व्यवस्थापन शास्त्राच्या तत्वांचा अंगिकार करुन बचत गटाच्या उत्पादनांना मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ मिळवून देणे हा स्वामिनी पथदर्शक प्रकल्पाचा एक भाग आहे. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यांकरिता विशेष ब्रँड

नाव, आकर्षक वेष्टनांचे डिझाईन व छपाई, उत्पादनांचे सादरिकरण, किंमत, गुणवत्ता व दर्जा टिकविणे अशा उपक्रमांचा समावेश असलेला ‘ स्वामिनी ’ प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पुणे येथील ‘ आम्ही कोल्हापूरी ’ व सोलापूर व मुंबई येथील ‘ दख्खन जत्रा ’ ह्या विशेष प्रदर्शनास चांगला प्रतिसाद मिळाला. राज्यातल्या बचत गटांनी तयार केलेल्या पदार्थांना चांगल्या दर्जाचे वेष्टन, बाजारपेठेत योग्य प्रमाणात महत्व मिळवून देण्यासाठी सुरवातीस रुपये ५ कोटी नियतव्यय देण्याचे मी प्रस्तावित करीत आहे.

**सुशिक्षित बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना व्यवस्थापकीय अनुदान.**

**४९.** सुशिक्षित बेरोजगारांनी स्थापन केलेल्या सहकारी सेवा संस्थांना प्रती सदस्य प्रती वर्ष रुपये १,२०० याप्रमाणे तीन वर्षाकरिता व्यवस्थापकीय अनुदान देण्यासाठी सन २००४-०५ या वर्षात रुपये १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. यापैकी जानेवारी २००५ पर्यन्त रुपये ७.७९ कोटी एवढा खर्च झाला आहे. सन २००५-०६ या वर्षामध्ये या प्रयोजनार्थ रुपये १० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**स्वयंरोजगार.**

**५०.१.** राज्य शासनाने सन २००० मध्ये रोजगार व स्वयंरोजगाराचे नवीन धोरण जाहिर केले आहे. त्यानुसार राज्यामध्ये २,८४७ बेरोजगार सेवा सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. सद्य:स्थितीत बेरोजगारांना शासकीय किंवा निमशासकीय अथवा इतर आस्थापनेखाली नोकरी मिळणे अवघड होत असल्याने बेरोजगारांना व बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना स्वयंरोजगारासाठी व त्याच्या उपजिविकेसाठी साधने उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. बेरोजगारी ही देशातील तसेच राज्यातील एक ज्वलंत समस्या आहे. राज्यातील बेरोजगारांची संख्या लाखांवर असून या सर्वांना

शासन सेवेत तसेच खाजगी क्षेत्रामध्ये सामावून घेणे अशक्यप्राय झाले आहे. ही परिस्थिती ओळखून शासनाने स्वयंरोजगारावर भर दिलेला आहे नव्हे तर यापुढील शासनाचा मुख्य भर बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार असा असेल. यास अनुसरुनच बेरोजगारांच्या नाविन्यपुर्ण अशा २,८०० पेक्षा जास्त सेवा सोसायटया राज्यातील विविध भागांत, विविध क्षेत्रांत कार्यरत असून त्यामध्ये वरचेवर भर पडत आहे. या सेवा सोसायटया विभाग निहाय विविध क्षेत्रामध्ये काम करत आहेत. उदा. कृषी क्षेत्रांतील विविध सेवा पुरविणा-या सोसायटया, मत्स्य व्यवसाय, हॉर्टीकल्चर, स्वच्छतेचे काम करणा-या सेवा सोसायटया या सेवा सोसायटयांना कामे देतांना अथवा त्यांनी कामे निवडतांना त्या त्या क्षेत्रांतील वर्धनक्षम व्यवसाय उपयुक्तता याचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. तसेच अशा सेवा सोसायटयांना विविध माध्यमांच्याव्दारे प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**५०.२.** बेरोजगारांकरिता स्वयंरोजगारासाठी व्यवसायाची आखणी स्थानिक परिस्थिती व मागणीप्रमाणे करण्यावर शासनाचा भर असून त्याप्रमाणे नव्या नव्या क्षेत्रामध्ये लक्ष देणे आवश्यक करणार आहे. उदाहरणार्थ कृषि, पशुसंवर्धन, हॉर्टीकल्चर, नगरविकास, ग्रामविकास, माहिती तंत्रज्ञान, सामाजिक वनिकरण, सिचन, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, शिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्था, पर्यटन व आदरातिथ्य इत्यादी क्षेत्रांमध्ये लहान लहान सेवा पुरविण्यासाठी मागणीप्रमाणे व गरजेप्रमाणे सेवा सोसायटया स्थापन होत आहेत व यामध्ये मोठ्या प्रमाणांत वाव आहे.

**इंटरनेट किऑस्क.** **५१.** माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करुन विशेषत: ग्रामीण क्षेत्राची उत्पन्न क्षमता वाढविणेसाठी Internet Kiosks स्थापन करण्यासाठी शासन धोरण आखीत आहे. Internet Kiosks च्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेती विषयक व इतर संबंधित सर्वसमावेशक माहिती उपलब्ध करुन देता येईल. तसेच गाव पातळीवर देय सेवा, सवलती उपलब्ध करुन देणे शक्य होईल. त्याच बरोबर Internet Kiosks च्या माध्यमातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीस मोठा वाव राहिल अशी अपेक्षा आहे.

**पर्यटन धोरण.** **५२.१.** महाराष्ट्राच्या विस्तीर्ण सागर तीरावरील सुंदर चौपाटया, राज्यभरातील किल्ले, धार्मिक स्थळे, जागतिक किर्तीच्या लेण्या, नैसर्गिक सौंदर्य, अभयारण्ये या सर्व बाबींचा विचार केल्यास महाराष्ट्र हा भारतातील दक्षिण आशियातील पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनू शकते. हे लक्षात घेवून राज्य शासनाने पर्यटन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचे धोरण ठरविले आहे.

**५२.२.** जागतिक किर्तीच्या अजंठा-वेरुळ लेण्याच्या संवर्धन व पर्यटन विकासाच्या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी जपान बँक ऑफ इंटरनॅशनल कॉर्पोरेशन मार्फत रुपये ३०० कोटी कर्ज रुपाने मंजूर असून, राज्य शासनाने रुपये ६० कोटी खर्च करावयाचे आहेत. या टप्प्यात लेणी संवर्धन, विमानतळ, रस्ते विकास, वनीकरण, पाणीपुरवठा, पर्यटन सुविधा इत्यादी घटकांचा समावेश आहे.

**५२.३.** प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत कोकण, खानदेश व विदर्भ विकास पॅकेज अंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. राज्यातील पर्यटन स्थळे, तीर्थस्थळे, इत्यादी ठिकाणी, याव्दारे, सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**५२.४.** सन २००४-०५ या. वर्षी रायगड जिल्ह्यातील दिवेआगार व हरिहरेश्वर या पर्यटन स्थळांच्या विकासासाठी रुपये ८ कोटी इतका निधी देण्यात आलेला आहे.

**५२.५.** सन २००५-०६ करिता पर्यटन क्षेत्रासाठी रुपये ७९.८० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

**नव्या लोक सहभागी धोरणाची वाटचाल.**

**५३.** "लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग" ही संकल्पना आता ग्रामीण भागात रुजलेली आहे. आर्थिक, तांत्रिक व व्यवस्थापकीय सहकार्य ग्रामस्थांना देऊन पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या योजनांची निवड, नियोजन, बांधकाम व व्यवस्थापन ग्राम स्तरावर होत आहे. विविध प्रकल्पाखाली राज्यात ३,०६१ ग्रामपंचायतीमध्ये अशा पध्दतीने कामे सुरु आहेत. ग्रामस्थांवर पूर्ण विश्वास टाकला व त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले तर स्वयंपूर्ण गावांचे स्वप्न सत्यात उतरु शकते हे शासनाने अंगीकारलेल्या या नव्या धोरणाने दाखवून दिले आहे.

**शुध्द पाणी पुरवठा.**

**५४.** पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबरोबरच ते शुध्द आणि स्वच्छ असणे तेवढेच आवश्यक आहे. राज्यात फ्लोराईड, नत्र व क्षार याचे प्रमाण विशेषत: भूगार्भातील पाण्यात जादा खोलीच्या विंधन विहीरी घेण्याच्या प्रवृत्तीमुळे वाढत आहे. यासाठी विंधन विहीरीच्या खोलीवर बंधन घालणे, पुनर्भरणाचा व्यापक कार्यक्रम हाती घेणे यासाठी लोक प्रबोधन करणे या उपाययोजना बरोबरच राज्यातील सर्व जिल्हयातील सुमारे ३.२५ लक्ष सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताची रासायनिक तपासणी करण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे. यासाठी रुपये २.५० कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**पिण्याच्या पाण्याची टंचाई.**

**५५.१.** सद्य:स्थितीत, ३५५ गावे व ९३ वाड्यांना ३३६ टँकर्सनी पाणी पुरवठा केला जात आहे . मागीलवर्षी याचवेळेस २,४७२ गावे व ४,९७५ वाड्यांना २,४३६ टँकर्सनी पाणी पुरवठा केला जात होता.

**५५.२.** ऑक्टोबर पासून पुढच्या जून अखेरपर्यंत तिमाही कृती आराखडे तयार करुन पाणी पुरवठ्याच्या योजना मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना व विभागीय आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. त्यानुसार, यावर्षीचे सर्व जिल्ह्यांचे टंचाईकृती आराखडे जिल्हाधिकाऱ्यांनी तयार केले आहे. नागरी भागात देखील पाणी टंचाई निवारणार्थ आवश्यक त्या उपाययोजना घेण्यात येत आहे. ग्रामीण व नागरी भागातील पाणी टंचाई निवारणार्थ सन २००३-०४ या आर्थिक वर्षात रुपये २४२.४५ कोटी तर २००४-०५ या आर्थिक वर्षात आतापर्यंत रुपये १९० कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**हांगणदारी मुक्तगांव अभियान व निर्मल ग्राम पुरस्कार.**

**५६.१.** संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या जोडीला आता हांगणदारी मुक्त गाव अभियान राज्यात सुरु करण्यात आले आहे. उघड्यावर शौचास बसण्याच्या बाबीचे विपरीत परिणाम लक्षांत घेता अत्यंत सोपे व कमी खर्चाचे शौचालय बांधण्यासाठी ग्रामस्थ स्वत:हून पुढे येत आहेत. आतापर्यत राज्यातील १०५ ग्रामपंचायती हांगणदारी मुक्त झाल्या आहेत.

**५६.२.** नुकताच नवी दिल्ली येथे माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते केंद्र शासनाने देशातील ३८ ग्रामपंचायतीना निर्मल ग्राम पुरस्कार दिला. त्यात आपल्या राज्यातील तब्बल १३ ग्रामपंचायतीना हा पुरस्कार मिळाला आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील

मुलभूत व महत्वाच्या प्रश्नाकडे जाणिवपूर्वक लक्ष देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने अंगीकारलेले धोरण यशस्वी होत आहे याचे हे उदाहरण आहे.

**मागणी आधारीत शौचालय बांधकाम.** **५७.** अत्यंत सोपे व शास्त्रीयदृष्ट्या योग्य शौचालय बांधून त्याचा नियमित उपयोग केल्यास दारिद्रयरेषेखालील कुटुंबाना रुपये ५०० एवढे प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. राज्यातील सर्व प्राथमिक शाळा, अंगणवाड्यामध्ये शौचालय बांधकाम मोहिम हाती घेण्यात आली आहे. या सर्व कामांसाठी राज्यातील ३३ ग्रामीण जिल्ह्यांसाठी ४३० कोटी रुपयाचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. या योजनेसाठी सन २००४-०५ मध्ये रुपये १८.८५ कोटी इतका खर्च झाला असुन, या प्रयोजनाकरिता सन २००५-०६ या वर्षाकरिता रुपये १६.५६ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**नागरी स्वच्छता अभियान.** **५८.** शहरांमधील स्वच्छता, पर्यावरणातील सुधारणा तसेच जनतेचे आरोग्यमान सुधारण्यासाठी राज्यामध्ये सन २००२-०३ पासून संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात लोक सहभागातून अनेक लोकोपयोगी कामे करण्यात आलेली आहेत. नागरी स्वच्छतेच्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महानगरपालिका व नगरपालिकांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे याकरिता या संस्थांना राज्यशासनाकडून सन २००५-०६ या वर्षाकरिता रुपये ६ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**बारमाही रस्त्यांनी गावे जोडणे.** **५९.** राज्यातील सर्वसाधारण क्षेत्रातील १,००० पेक्षा अधिक आणि डोंगरी अथवा आदिवासी क्षेत्रातील ५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली सर्व गांवे बारमाही रस्त्याने जोडण्याचा

कार्यक्रम प्राधान्याने राज्यात राबविण्यात येत आहे. डिसेंबर २००४ अखेर ४०,४१२ गावांपैकी ३८,००० म्हणजे ९४ टक्के गावे बारमाही रस्त्याने जोडली गेली आहेत.

उद्योग. **६०.१.** महाराष्ट्र हे देशातील औद्योगिक क्षेत्रातील अग्रगण्य असे राज्य असून त्यात गेल्या तीन वर्षात सरासरी ९ टक्के औद्योगिक वाढ झालेली आहे. जागतिक बँक व सीआयआय यांनी अलिकडेच केलेल्या, भारताच्या औद्योगिक वातावरणाचे मुल्यांकन, २००४, औद्योगिक निर्मितीची स्पर्धात्मकता वाढविणे, इंडस्ट्रीयल क्लायमेट ॲसेसमेंट ऑफ इंडिया, २००४, इम्प्रुव्हींग मॅन्युफॅक्चरिंग कॉम्पिटिटिव्हनेस, या विषयाबाबतच्या अभ्यासामध्ये महाराष्ट्र हे गुंतवणूकीच्या दृष्टीने अत्यंत पोषक असे वातावरण असलेले क्रमांक एकचे राज्य आहे असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. या अभ्यासामध्ये औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेले महत्वाचे निश्चायक घटक विचारात घेण्यात आले आहेत.

**६०.२.** "निर्यात व तदनुषंगिक कार्यक्रमांसाठी पायाभूत सुविधा देण्यासाठी राज्यांना अर्थसहाय्य" (ASIDC) या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील निर्यातवृध्दीसाठी रुपये २४४ कोटीएवढे केंद्रीय अर्थसहाय्य अंतर्भूत असलेल्या रुपये ५१३ कोटीच्या २९ पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. याशिवाय, रुपये ५५० कोटी एवढया गुंतवणूकीचे ४४ नवीन प्रकल्प लवकरच हाती घेण्यात येत आहेत.

**६०.३.** राज्यात महत्त्वाच्या औद्योगिक समूहाच्या सक्षमीकरणासाठी ठाणे-बेलापूर महाड, लोटे परशुराम व रोहा या ठिकाणच्या रासायनिक उद्योग समूह, पुणे व औरंगाबाद येथील ऑटो व ऑटो कॉम्पोनेन्ट उद्योग, सोलापूर, इचलकरंजी, मालेगाव, भिवंडी व नागपूर येथील वस्त्रोद्योग आणि कोल्हापूर

येथील फाऊंड्री उद्योग यासाठी एकूण रुपये ५५० कोटी एवढया प्रकल्प खर्चाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी भारत सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. पुणे, सोलापूर, भिवंडी, मालेगांव आणि बुटीबोरी (नागपूर) येथील रुपये १७५ कोटी एवढया गुंतवणूकीच्या प्रकल्पांची अंमलबजावणी चालू असून रुपये ११५ कोटी एवढया केंद्रीय सहाय्यापैकी रुपये २१ कोटी एवढा निधी वापरण्यात आला आहे.

**६०.४.** राज्यातील यंत्रमागधारकांकरिता जाहिर करण्यात आलेल्या धोरणानुसार लघु यंत्रमागधारकांना कर्जाच्या परतफेडीसाठी ५० टक्के अनुदान देणे तसेच, कर्जाच्या उर्वरीत रकमेवरील व्याजापैकी ५ टक्के व्याज अनुदान शासनातर्फे उपलब्ध करुन देणे यासाठी रुपये ७५ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

**६०.५.** विदर्भ, मराठवाडा व कोकण विभागासाठी लघु औद्योगिक घटकांचा अर्थसहाय्याचा अनुशेष दूर करण्यासाठी एकूण रुपये ३२.५९ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

**वीज निर्मितीबाबत ज्याचे रण व पारेषण व्यवस्था.**

**६१.१.** राज्यात विजेचा तुटवडा असल्याची राज्य शासनास जाणिव आहे. यावर मात करण्यासाठी विद्युत निर्मिती क्षमतेमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने परिणामकारक उपाययोजना आखलेल्या आहेत. परळी आणि पारस येथे प्रत्येकी २५० मेगावॅट क्षमतेच्या विस्तारित प्रकल्पाचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून हाती घेण्यात आले आहे. गॅसवर आधारित १,०४० मेगावॅट उरण विस्तारित प्रकल्प, गॅसवर आधारित १,४०० मेगावॅट तळेगांव विद्युत प्रकल्प व कोळशावर आधारित ५०० मेगावॅट खापरखेडा विस्तारीकरण प्रकल्प उभारण्याचे

विचाराधीन आहे. राज्यातील वीजेची निर्मिती वाढविण्यासाठी अधिक गुंतवणूक होणे आवश्यक आहे. त्यासाठी उर्जा क्षेत्रात खाजगी व संयुक्त गुंतवणूकीचे धोरण निश्चित केलेले आहे.

**६१.२.** शासनाने वीज पुरवठ्यात सुधारणा करुन येत्या ५ वर्षात भारनियमन पूर्णपणे संपविण्याकरिता व वीज निर्मिती क्षेत्रात गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने शासनाने खालील महत्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले आहेत :—

(१) वीज निर्मिती क्षेत्रात ५०० मेगावॅट व त्यापेक्षा जास्त निर्मिती क्षमतेसाठी खाजगी गुंतवणूकीसाठी धोरण ठरविले आहे.

(२) राज्यामध्ये विद्युत मंडळामार्फत सिंगल फेज यंत्रणा राबविण्यासाठी विद्युत मंडळ, रुपये ५०० कोटी उभारेल. सिंगल फेज यंत्रणेमुळे ग्रामीण भागातील घरगुती वापराची वीज नियमित उपलब्ध राहील व त्यामुळे भार नियमनाची समस्या अशा वापरासाठी निश्चितच कमी होईल.

**६१.३.** राज्यामध्ये विखुरलेल्या विद्युत निर्मिती केंद्रांमधून निर्माण होणाऱ्या वीजेचा पुरवठा योग्य दाबाने व सुरळीतपणे ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी सन २००५-०६ मध्ये २२० किलोव्होल्टची ४ उपकेंद्रे व १३२ किलोव्होल्टची ६ उपकेंद्रे स्थापन करणे, ७०० सर्किट किलोमीटर अतिउच्च दाबवाहिनी उभारणे, २,००० एम. व्ही. ए. ने अतिउच्चदाबाच्या उपकेंद्राची क्षमता वाढ व २०० एम. व्ही. ए. आर. चे कॅपॅसिटर्स बसविणे असे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**अपारंपारिक ऊर्जेद्वारे गावांचे विद्युतीकरण.** ६२.१. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने राज्यातील अतिदुर्गम भागातील २४९ गावांचे विद्युतीकरण अपारंपारिक ऊर्जेद्वारे करण्याचे ठरविले असून त्यासाठी रुपये १२९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. यापैकी ९० टक्के हिस्सा केंद्र शासन उचलणार असून राज्य शासनाचा हिस्सा १० टक्के राहणार आहे. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगांव या तालुक्यामध्ये हा कार्यक्रम विशेष कृती कार्यक्रमाद्वारे घेण्यात येणार आहे. १६ गावांच्या विद्युतिकरणास केंद्र शासनाने मान्यता दिली असून त्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

६२.२. बायोडीझेल या नवीन अपारंपारिक इंधन निर्मितीवर शासन भर देणार असून त्यासाठी पडीक जमिनीवर जट्रोपा या वनस्पतीची लागवड करण्यात येणार आहे. हे शेतकऱ्यांना उत्पन्न देणारे पीक असल्यामुळे यासाठी कृषी, रोजगार हमी योजना, भारत सरकारचे ऑईल बोर्ड याचा निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. खाजगी प्रवर्तकांमार्फत जेट्रोपाची लागवड करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

**मोफत वीज योजना.** ६३. मागील दोन तीन वर्षात राज्यातील तीव्र दुष्काळी परिस्थितीला तोंड देऊन सामान्य शेतकरी हवालदिल झालेला होता व आर्थिकदृष्टया गांजला होता. त्यास या परिस्थितीतून बाहेर काढण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून शेतकऱ्यांच्या वीज पंपावरील वीजेचा पुरवठा दिनांक १ जुलै २००४ पासून मोफत करण्याचा निर्णय शासनाने घेतला. मोफत वीज पुरवठयामुळे मोठया प्रमाणात वीजेचा वापर झाल्याने भारनियमनात अधिकच भर पडली. मोफत वीज पुरवठयामुळे शेती पंपावरील वीजेचा अमर्याद वापर झाल्यामुळे त्याचा परिणाम भूगर्भातील पाण्याच्या पातळी कमी होण्यात झाल्याचे दिसून आले आहे. गेल्या नऊ

महिनांच्या अनुभवावरून शासनाला मोफत वीज पुरवठा संबंधातील नवीन धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक झाले आहे. या अर्थसंकल्पात वीज अनुदानापोटी रुपये ७५० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित असून या मर्यादेत गरजू व गरीब शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन वीज पुरवठ्याचे धोरण स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येईल. भावी कालावधीत वीज क्षेत्रासाठी मोठ्या गुंतवणूकीची आवश्यकता आहे. म्हणूनच, आम्ही राज्यातील वीज क्षेत्रामध्ये सार्वजनिक तसेच खाजगी गुंतवणूकदारांकडून गुंतवणूक करुन घेण्यासाठी एक अत्यंत महत्वाकांक्षी योजना तयार केली आहे. त्याचबरोबर, केंद्र सरकारच्या पुढाकाराने आणि वित्तीय संस्थांच्या सक्रीय सहकार्याने राज्यातील दाभोळ विद्युत प्रकल्प पुन्हा कार्यान्वीत करण्यात येईल अशी मला अपेक्षा आहे.

**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना.**

**६४.** स्पर्धात्मक वातावरण निर्मितीद्वारे अधिनियम २००३ अन्वये ऊर्जा क्षेत्रात सुधारणा प्रस्तावित आहेत. अधिनियमाद्वारे विद्युत मंडळाची पुनर्रचना अभिप्रेत असून बऱ्याच राज्यांनी त्यांच्या विद्युत मंडळाची पुनर्रचना करुन स्थापन केल्या आहेत. ही पुनर्रचना दिनांक १० जून २००४ पर्यंत पुर्ण करावयाची होती. तथापी, महाराष्ट्र शासनाने यास दिनांक १० जून २००५ पर्यंत मुदतवाढ घेतलेली आहे. महाराष्ट्र शासनाने मंडळाची पुनर्रचना करुन होल्डींग कंपनी, निर्मिती कंपनी, पारेषण कंपनी व वितरण कंपनी स्थापन करण्यास तत्वतः मान्यता दिली आहे. ही पुनर्रचना दिनांक १० जून २००५ पर्यंत पूर्ण होईल. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात तसेच राज्यातील ऊर्जा क्षेत्रात सुधारणा पुनर्रचनेमुळे निश्चितपणे घडून येतील.

**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना.**

**६५.१.** दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करुन देऊन त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणणे हा स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेअंतर्गत प्रामुख्याने बचत गट स्थापण्यावर भर देण्यात येतो. योजना सुरु झाल्यापासून योजने अंतर्गत एकूण रूपये ५५७.७० कोटी एवढा निधी खर्च करण्यात येऊन एकूण ३.९९ लक्ष लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे व एकूण रूपये ७१२.७८ कोटी एवढा कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. लाभ देण्यात आलेल्या एकूण १८,४३८ स्वयंसहाय्यता गटांनी व्यवसाय सुरु केलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत २.०३ लक्ष महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

**६५.२.** स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या अंमलबजाणीसाठी सन २००५-०६ या वर्षाकरिता राज्याच्या हिश्श्यापोटी रुपये ३२.९४ कोटी एवढा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. यामध्ये विशेष घटक योजनेसाठी रुपये ११.०८ कोटी व आदिवासी क्षेत्रासाठी राज्याच्या हिश्श्यापोटी रुपये ९.०२ कोटी निधीचा अंतर्भाव आहे.

**तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी सुरक्षात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजना.**

**६६.** सातारा जिल्ह्यातील मौजे मांढरदेवी येथील काळेश्वर देवीच्या यात्रेत झालेल्या चेंगराचेंगरीसारख्या घटना राज्यात इतर तीर्थक्षेत्राच्या व यात्रास्थळाच्या ठिकाणी उद्‌भवू नयेत, म्हणून अशा ठिकाणी यात्रा व उत्सवाचे वेळी व त्यापूर्वी करावयाच्या प्रतिबंधात्मक व सुरक्षात्मक उपाययोजनांबाबतच्या विस्तृत मार्गदर्शक सूचना शासनाने निर्गमित केल्या आहेत. मोठया यात्रांच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने आराखडे तयार करण्यात येत असुन अशा उपाययोजनां साठी आवश्यक तो निधी उपलब्ध करण्यात येईल.

**ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम.** **६७.१.** या योजनेअंतर्गत राज्यांत जिल्हा पातळीवरील १०९ आणि राज्य स्तरावरील एकूण २४ तीर्थक्षेत्रांची कामे प्रगतीपथावर आहेत.

**६७.२.** यासाठी जिल्हा स्तरावरील कामासाठी रुपये ८.७३ कोटीसह एकूण रुपये ३१.२३ कोटी इतका नियतव्यय सन २००५-०६ या वर्षासाठी प्रस्तावित केला आहे.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना.** **६८.** संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००२-०३ पासून राज्यभर एकात्मिक स्वरूपात राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत रोजगाराचा भाग म्हणून दारिद्र्य रेषेखालील मजुरांना सवलतीच्या दराने ५ किलोग्रॅम अन्नधान्य प्रति व्यक्ती प्रतिदिन वाटप करण्यात येत असून उर्वरित मजूरी रोखीने प्रदान करण्यात येत आहे. या योजनेचा प्राथमिक उद्देश अतिरिक्त रोजगार निर्मिती व अन्न सुरक्षा देणे, असा असून ही योजना ग्रामीण भागातील जनतेस अकुशल रोजगार उपलब्ध करुन देते. सन २००५-०६ या वर्षाकरिता राज्य हिश्श्यापोटी रुपये १२१.७९ कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

रा

**इंदिरा आवास योजना.** **६९.** ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे सदस्य, मुक्त वेठबिगार आणि बिगर अनुसूचित जाती व जमातीच्या गरीब व्यक्ती यांना अनुदान देऊन त्याच्या घरकुलांच्या बांधकामासाठी मदत करणे हे इंदिरा आवास योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. सन २००४-०५ या वर्षामध्ये आतापर्यंत ६१,००७ घरकुले पूर्ण झाली असून ६९,२०० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. सन २००५-०६ साठी रुपये ११९.३६ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**वाल्मिकी आंबेडकर आवास योजना.**

**७०.१.** शहरी भागांतील झोपडपट्टीवासीयांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तथापि, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबियांसाठी वाल्मीकी आंबेडकर आवास योजना जाहीर केलेली आहे. या योजनेतंर्गत नवीन घराचे बांधकाम याकरीता ६० टक्के नियतव्यय रहात असलेल्या / अस्तित्वात असलेल्या झोपड्यांची दुरुस्ती वा श्रेणीवाढ यासाठी २० टक्के नियतव्यय व निर्मल भारत अभियान याकरीता २० टक्के नियतव्यय या प्रमाणात निधीचा वापर करावयाचा आहे. २००१ च्या जनगणने नुसार ५० हजार वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ८० शहरांमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**७०.२.** वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत ८० शहरामध्ये दिनांक २८ फेब्रुवारी २००५ पर्यंत २७,७९३ घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. या योजनेकरिता सन २००५-०६ वर्षाकरिता रुपये ३६.१५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**ग्रामीण निवारा योजना.**

**७१.१.** शहरी भागातील गरजुसाठी वांबीसारख्या गृहनिर्माण योजना आहेतच.

**७१.२.** ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांना घरे बांधुन देण्याची महत्त्वाकांक्षी योजना या वर्षापासुन शासन सुरु करत आहे. या योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील ज्या लोकांना इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळु शकत नाही, अशा लाभार्थींना त्यांच्या जागेवर प्रत्येकी रुपये ४०,००० च्या मर्यादेत घरे बांधण्याकरिता अर्थसहाय्य देण्यात येईल. या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन करण्यात येईल.

**ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम.** **६७.१.** या योजनेअंतर्गत राज्यांत जिल्हा पातळीवरील १०९ आणि राज्य स्तरावरील एकूण २४ तीर्थक्षेत्रांची कामे प्रगतीपथावर आहेत.

**६७.२.** यासाठी जिल्हा स्तरावरील कामासाठी रुपये ८.७३ कोटीसह एकूण रुपये ३१.२३ कोटी इतका नियतव्यय सन २००५-०६ या वर्षासाठी प्रस्तावित केला आहे.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना.** **६८.** संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००२-०३ पासून राज्यभर एकात्मिक स्वरूपात राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत रोजगाराचा भाग म्हणून दारिद्र्य रेषेखालील मजुरांना सवलतीच्या दराने ५ किलोग्रॅम अन्नधान्य प्रति व्यक्ती प्रतिदिन वाटप करण्यात येत असून उर्वरित मजूरी रोखीने प्रदान करण्यात येत आहे. या योजनेचा प्राथमिक उद्देश अतिरिक्त रोजगार निर्मिती व अन्न सुरक्षा देणे, असा असून ही योजना ग्रामीण भागातील जनतेस अकुशल रोजगार उपलब्ध करुन देते. सन २००५-०६ या वर्षाकरिता राज्य हिश्श्यापोटी रुपये १२१.७९ कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

रा

**इंदिरा आवास योजना.** **६९.** ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे सदस्य, मुक्त वेठबिगार आणि बिगर अनुसूचित जाती व जमातीच्या गरीब व्यक्ती यांना अनुदान देऊन त्याच्या घरकुलांच्या बांधकामासाठी मदत करणे हे इंदिरा आवास योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. सन २००४-०५ या वर्षामध्ये आतापर्यंत ६१,००७ घरकुले पूर्ण झाली असून ६९,२०० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. सन २००५-०६ साठी रुपये ११९.३६ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**वाल्मिकी आंबेडकर आवास योजना.**

**७०.१.** शहरी भागांतील झोपडपट्टीवासीयांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तथापि, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबियांसाठी वाल्मीकी आंबेडकर आवास योजना जाहीर केलेली आहे. या योजनेतंर्गत नवीन घराचे बांधकाम याकरीता ६० टक्के नियतव्यय रहात असलेल्या / अस्तित्वात असलेल्या झोपड्यांची दुरुस्ती वा श्रेणीवाढ यासाठी २० टक्के नियतव्यय व निर्मल भारत अभियान याकरीता २० टक्के नियतव्यय या प्रमाणात निधीचा वापर करावयाचा आहे. २००१ च्या जनगणने नुसार ५० हजार वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ८० शहरांमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**७०.२.** वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत ८० शहरामध्ये दिनांक २८ फेब्रुवारी २००५ पर्यंत २७,७९३ घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. या योजनेकरिता सन २००५-०६ वर्षाकरिता रुपये ३६.१५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**ग्रामीण निवारा योजना.**

**७१.१.** शहरी भागातील गरजुसाठी वांबीसारख्या गृहनिर्माण योजना आहेतच.

**७१.२.** ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांना घरे बांधुन देण्याची महत्त्वाकांक्षी योजना या वर्षापासुन शासन सुरु करत आहे. या योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील ज्या लोकांना इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळु शकत नाही, अशा लाभार्थींना त्यांच्या जागेवर प्रत्येकी रुपये ४०,००० च्या मर्यादेत घरे बांधण्याकरिता अर्थसहाय्य देण्यात येईल. या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन करण्यात येईल.

**पिक विम्याची विक्रमी नुकसान भरपाई रक्कम वाटप.**

**७६.** रब्बी २००३-०४ हंगामासाठी पिक योजने अंतर्गत रुपये १९३.६५ कोटी एवढया विक्रमी रक्कमचे दावे मंजूर झाले होते. सदर नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अदा करण्यासाठी विमा हप्ता वगळता ५० टक्के राज्य हिश्श्याची रुपये ९१.१० कोटी एवढी रक्कम अदा केलेली असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे वाटप केलेले आहे. याचा लाभ राज्यातील ९.१४ लक्ष एवढया शेतकऱ्यांना मिळाला आहे. सन २००४-०५ या वर्षात एकूण रुपये १३१.१४ कोटी एवढी रक्कम व सन २००५-०६ या वर्षासाठी रुपये १३० कोटी नुकसान भरपाई साठी राज्य हिश्श्यापोटी प्रस्तावित केले आहे.

**मत्स्यव्यवसाय.**

**७७.१.** सन २००४-०५ अखेर सागरी क्षेत्रात मच्छिमारांच्या सहकारी संस्थांमार्फत २,०९६ नौकांना यांत्रिकीकरणासाठी अर्थसहाय्य, १०८ ट्रक आणि १२ बर्फ कारखान्यांसाठी कर्ज देण्यात आले. मच्छिमार बंदरांवर मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी ९२ कामे पूर्ण करण्यात आली. यासाठी रुपये ३.३६ कोटी एवढी रक्कम खर्च करण्यात आली. कोकण विकास कालबध्द कार्यक्रमांतर्गत ३ बंदराची कामे प्रगतीपथावर असून, ११ जेट्टींची कामे पूर्ण झालेली आहेत आणि १० जेट्टींची कामे प्रगतीपथावर आहेत. सन २००५-०६ या वर्षाकरिता रुपये ६४.१० लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**७७.२.** भूजलाशयीन क्षेत्रातील मत्स्योत्पादनात भरीव वाढ होऊन हे उत्पादन १.२८ लक्ष मेट्रीक टन झाले आहे. राज्यातील ४२ मत्स्यबीज उत्पादन केंद्रातून १६.४४ कोटी मत्स्यबीज निर्मिती झाली आहे. दापचरी जि. ठाणे गोडया पाण्यातील कोळंबी बीज उत्पादन केंद्र येथे बांधण्यात आलेले असून ते लवकरच सुरु करण्यात येणार आहे. या केंद्राची ४ कोटी

कोळंबी बीज निर्मितीची क्षमता आहे. मत्स्यबीज उत्पादन केंद्रावर जानेवारी २००५ अखेर रुपये ४२.४७ लक्ष इतका खर्च झाला आहे. या प्रयोजनाकरिता सन २००५-०६ करिता रुपये १.४४ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**७७.३.** विदर्भातील ११ जिल्हयांत मत्स्य बोटुकली आणि कोळंबी बीज संचयनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी रुपये ५.५० कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे. त्यापैकी रुपये २.०५ कोटी आणि रुपये ९९.३५ लक्ष निधी अनुक्रमे मत्स्य बीजे आणि कोळंबी बीजे संचयनावर खर्च झालेला आहे.

**शासकीय ...ध योजना.**

**७८.** सध्या राज्यातील दुग्ध व्यवसायाचे व्यवस्थापन महाराष्ट्र शासनाच्या दुग्ध विकास विभागाकडून करण्यांत येते. राज्यातील शासकीय दूध योजनांचे सहकारीकरण करण्याबाबतचे धोरण यापूर्वीच शासनाने आखलेले आहे. राज्यातील दूध व्यवसाय आता स्थिरावला असून या व्यवसायातून शासनाने टप्प्याटप्याने आपले अंग काढुन घेणे योग्य राहील. शासकीय दूध योजनेतील २००४-०५ मधील अंदाजित तोटा रुपये १५० कोटी इतका आहे तर ३१ मार्च २००४ पर्यंतचा संचित तोटा रुपये ३,१०० कोटी इतका झालेला आहे. याचा विचार करता, राज्यामधील शासकीय दुग्ध व्यवसाय टप्प्याटप्प्याने महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंदा) या सहकार क्षेत्रातील उपक्रमाकडे हस्तांतरित करण्यात यावा. महानंदा या शिखर संस्थेत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होत असुन मे २००५ मध्ये नवनिर्वाचित मंडळ कार्यभार हाती घेणार आहे. या प्रक्रियेचा तपशिल निश्चित करण्यात येत असून आगामी वर्षात ही प्रक्रिया पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. या हस्तांतरण प्रक्रियेमुळे दुग्ध उत्पादन आणि त्याची विक्री या क्षेत्रामधील सहकारी चळवळ अधिक बळकट होवून त्याद्वारे

राज्यामधील शेतकऱ्यांना निश्चितच लाभ होईल असा मला विश्वास वाटतो.

खार जमीन विकास.

७९. खार जमीन विकास अंतर्गत डिसेंबर २००४ अखेर बांधकामासाठी जलसंपदा विभागाने एकुण रुपये ५२.५४ कोटी इतका खर्च केला आहे. त्यातून एकूण ११९ योजनांचे काम हाती घेऊन पूर्ण करण्यात आले त्यामुळे ७,०३४ हेक्टर क्षेत्र सुरक्षित झाले. त्याचबरोबर बोडकालीन जुन्या २१८ खारभूमी विकास योजनांचे नुतनीकरण करुन त्या योजना सुस्थितीत आणण्यात आल्या आहेत. त्यांचे संरक्षित क्षेत्र ३०,२२० हेक्टर आहे. सद्य:स्थितीत० ३८ योजना प्रगतीपथावर आहेत व त्याद्वारे ५,२८६ हेक्टर क्षेत्र पुन:प्रापित होणार आहे. या प्रयोजनार्थ सन २००५-०६ या वर्षामध्ये रुपये ४.९७ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

रा

जलविद्युत योजना.

८०. सन २००४-०५ मध्ये २५० मेगावॅट क्षमतेचे सरदार सरोवर कालवा जलविद्युत गृह कार्यान्वित झाले असून २५० मेगावॅट क्षमतेचा घाटघर उदं्चन जलविद्युत योजना कोयना धरण मजबुतीकरण व कोयना टप्पा-४ अधिजल भूयाराची लांबी ही प्रमुख कामे प्रगतीपथावर आहेत. वार्षिक योजना सन २००५-०६ या वर्षासाठी सदर लेखाशीर्षाखाली रुपये १०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. यापैकी घाटगर जलविद्युत प्रकल्पासाठी रुपये ३७.७५ कोटी व कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा-४ यासाठी रुपये २५.४७ कोटी इतका नियतव्यय सन २००५-०६ साठी प्रस्तावित करण्यात आले आहे.

पाटबंधारे प्रकल्पात खाजगी क्षेत्राचा सहभाग.

८१. महाराष्ट्र राज्याचे ढोबळ उत्पन्न (GDP) सर्वाधिक असले तरी राज्यामधील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंब संख्या लक्षणीय आहे. ग्रामीण क्षेत्रामधील दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमातील मंदगती प्रगतीचे एक कारण असे आहे की, राज्यात सिंचन क्षेत्राच्या सुविधा कमी प्रमाणात आहेत. त्या दृष्टीने राज्यामधील मर्यादित जलसंपदा (पाटबंधारे) क्षमतेचा जास्तीत जास्त वापर करुन घेणे ही बाब आमच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. पाटबंधारे क्षेत्रासाठी आम्ही वर्षोनवर्षे मोठी आर्थिक गुंतवणूक केलेली आहे. राज्यामधील बरेचशे जलसंपदा प्रकल्प पूर्ण होण्याच्या निरनिराळ्या टप्प्यामध्ये आहेत. हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि मर्यादित साधनसंपत्तीत वाढ होण्याच्या दृष्टीने या प्रकल्पांमध्ये बांधा-मालकीसह वापरा व हस्तांतरण करा तत्त्वावर खाजगी गुंतवणुकदारांमार्फत मोठे जलविद्युत प्रकल्पही विकसीत केले जातील. खाजगी उद्योजकांमार्फत करण्यासाठी महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम,१९७६ मधील खंड १ मधील कलम २ (सात) मधील कंपनी या व्याख्येमध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने विधी मंडळास विधेयक सादर केले आहे.

एकाधिकार कापूस योजना.

८२. महाराष्ट्राच्या कापसाची खरेदी हा सातत्याने शासनांतर्गत तसेच शासनाबाहेर चर्चेचा विषय झालेला आहे. शासकीय तिजोरीवर प्रचंड ताण असतांना सुध्दा आम्ही कापूस खरेदी संदर्भात शेतकऱ्यांना वेळोवेळी दिलेली आश्वासने पाळलेली आहेत. कापूस खरेदीसाठी अद्यापपर्यंत रुपये १,३०० कोटीची रक्कम वितरित केली असून, उर्वरित रक्कम सुध्दा लवकरच वितरित करण्यात येणार आहे. वस्तुतः सदर योजना व्यापाऱ्यांपासुन शेतकऱ्यांना संरक्षण देऊन त्यांना संपूर्ण बाजारभाव मिळवून देण्यासाठी ना-नफा-ना-तोटा तत्त्वावर तयार करण्यात आली

होती आणि त्याआधारावर २० वर्षापेक्षा जास्त काळ यशस्वीपणे राबविण्यात आली. परंतु मागील काही वर्षात किमान आधारभूत किंमत आणि प्रचलित बाजारभावाचा विचार न करता कापूस एकाधिकार योजनेतील खरेदी किंमत फारच अधिक ठेवल्याने सदर योजनेत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. मागील काही वर्षे कापसाच्या शेतकऱ्यांना वाढीव खरेदी किंमत देण्यात आली व त्यामुळे कापूस खरेदी योजनेमधील राज्य शासनाला सोसाव्या लागणाऱ्या तोट्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली व पर्यायाने सदर योजना आता या स्वरुपात टिकविणे अशक्यप्राय झालेले आहे. म्हणून या संपूर्ण प्रश्नाचा पुनर्विचार करण्याची आता वेळ आली असून, आधारभूत किंमतीला अधीन राहुन बाजार भावानुसार खरेदी करण्याचे मूळ तत्त्वानुसार योजनेचे व्यवस्थापन पुनश्चः ना-नफा- ना-तोटा या तत्वावर स्विकारणे आवश्यक झाले आहे. त्याचवेळी खुल्या बाजारामध्ये कापसाच्या किंमती घटत असल्यामुळे, कापसाला पर्यायी पिकांची निवड करण्यास प्रोत्साहन देण्याची वेळ आली आहे. कापूस उत्पादन होणाऱ्या प्रदेशामधील जमीन व हवामान सोयाबीन सारख्या तेल बीया पिकांच्या उत्पादनासाठी अधिक अनुकूल आहेत. म्हणूनच, कापसाला पर्यायी पिकांसाठी राज्य कृषि विभागाकडून प्रोत्साहन योजना तयार करण्यात येत आहेत. म्हणून मी शेतकऱ्यांना या योजनांचा पूर्णपणे वापर करुन घेण्यास आवाहन करतो.

**मुंबईचा विकास.** **८३.१.** मुंबईच्या आर्थिक विकासाची गती वाढावी व येथील जनतेचे जीवनमान सुधारावे यासाठी शासनाने आराखडा तयार केला आहे. यामध्ये प्रामुख्याने पायाभूत सोयी, गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधारणा, आर्थिक विकास व कार्यतत्पर सेवा इत्यादी बाबींचा समावेश आहे. यातील काही प्रकल्पांना यापूर्वीच

सुरुवात झाली आहे. बांद्रा-वरळी जलसेतूचे काम चालू असून रुपये १,३०६ कोटी किंमतीच्या या प्रकल्पाचे काम सन २००७ पर्यंत पूर्ण होईल. जागतिक बँकेच्या मदतीने सुरु असलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत रुपये १,११३ कोटीची कामे पूर्ण झाली आहेत. याच प्रकल्पा अंतर्गत १०१ नवीन उपनगरीय रेल्वे गाड्या उपलब्ध होणार असून प्रत्यक्षात सन २००७ पर्यंत या गाड्या वापरात येतील. यामुळे उपनगरीय रेल्वे प्रवाशांना दिलासा मिळेल. रुपये २,६०० कोटीच्या मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पा (MUIP) अंतर्गत ४६२ कि.मी. रस्ते, ४१ उड्डाणपूल, ६६ भूयारी मार्ग व ३०० कि.मी.लांबीचे फुटपाथ बांधले जाणार आहेत. यामुळे सध्याच्या प्रमुख रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच मुंबईतील पूर्व-पश्चिम वाहतूक अधिक गतीमान होण्यासाठी मदत मिळणार आहे. सन २००७ पर्यंत हे सर्व प्रकल्प पूर्णत्वास पोहोचतील अशी अपेक्षा आहे. या प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या कुटुंबांचेही पुनर्वसन करण्याची योजना आखण्यात आली आहे. ५३,००० घरें आता बांधून तयार असून पुढील ५ महिन्यात सुमारे ३.५० लक्ष झोपडपट्टीवासियांना स्वतःचे घर उपलब्ध होणार आहे. १,५०० कोटी रुपयांच्या वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर लाईट रेल प्रकल्पासही सुरुवात करण्यात आली असून पुढील ४ ते ५ वर्षात हा प्रकल्प पूर्णत्वास नेला जाईल. मुंबई विकासासाठी वर्ष २००५-०६ मध्ये रुपये १,००० कोटींची तरतूद केली जाईल.

**८३.२.** या व्यतिरिक्त काही महत्वाचे प्रकल्प केंद्र शासनाकडे मदतीसाठी सादर करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने प्रथमच मुंबईचे महत्व ओळखून मुंबईच्या विकासासाठी ठोस मदत करण्याचे जाहिर केले आहे. केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात

प्रामुख्याने मुंबई मेट्रो प्रकल्प, शिवडी-न्हावा जलसेतू प्रकल्प तसेच पश्चिम द्रूतगती मार्गाचा समावेश करण्यात आला आहे व त्यासाठी आर्थिक तरतूदही करण्यात येत आहे.

८३.३. भौगोलीकदृष्ट्या लंडन व टोकियो दरम्यान, मुंबई अत्यंत मोक्याच्या ठिकाणी आहे. मुंबई ही केवळ देशाची आर्थिक राजधानी न राहता मुंबईचे सामर्थ्य आखाती प्रदेशात तसेच दक्षिण व दक्षिण-पूर्व आशियात पसरविणे शक्य आहे. हेच ओळखून केंद्र शासनाने मुंबईस प्रादेशिक वित्तीय केंद्र म्हणून विकसीत करण्यासाठी पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. यामुळे बँकींग, विमा तसेच इतर वित्तीय क्षेत्रातून रोजगारासाठी मोठी संधी उपलब्ध होऊ शकेल.

८३.४. मुंबई विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या कार्य गटाने मुंबईमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी पर्यटन क्षेत्र विकसित करण्याची सूचना केली आहे. याचाच भाग म्हणून गोराई येथील पर्यटनासाठी विशेष आर्थिक क्षेत्र मंजूर करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

**मुंबई पारबंदर मार्ग प्रकल्प.**

८४.१. मुंबई पारबंदर मार्ग प्रकल्प (Mumbai Trans Harbour Link Project) या प्रकल्पाला आता आकार येत आहे. हा सागरी मार्ग २२ किलोमिटर लांब व सहा मार्गीकाचा असून हा मुंबई बेटाला मुख्यभूमीशी जोडणारा आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत रुपये ४,००० कोटी आहे.

८४.२. या मार्गाकरीता आवश्यक असलेला प्राथमिक तांत्रिक अभ्यास पूर्ण झालेला असून महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प बी.ओ.टी. तत्त्वावर राबविण्याचे ठरविले आहे. हा प्रकल्प

राबविण्यासाठी उद्योजकांच्या पुर्व अर्हताकरीता निविदा प्राप्त झाल्या आहेत. केंद्र शासनाने या प्रकल्पास पर्यावरण विषयक मंजूरीही दिली आहे. काम सुरु झाल्यापासून चार वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील.

**मुंबई पूर्व व पश्चिम तट आंतरराज्य प्रवासी जल वाहतुक.**

८५.१. मुंबईची रस्ते व रेल्वे वाहतुक वर्दळीचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने मुंबई पूर्व व पश्चिम तट आंतरराज्य प्रवासी जल वाहतुक प्रकल्पाचा विकास करण्याचे ठरले आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी खाजगीकरणा अंतर्गत उद्योजकाला मुंबईच्या पश्चिम तटावर प्रवासी जल वाहतुक कार्यान्वित करण्यासाठी सदर कामाचे स्विकृती पत्र देण्यात आले आहे.

८५.२. या व्यतिरिक्त मुंबई व नवी मुंबई यांना जोडणारा मुंबई पूर्व तट प्रवासी जल वाहतुक बाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.

**बांद्रा-वरळी सागरी मार्ग प्रकल्प.**

८६. रुपये १,३०६ कोटी किमतीच्या बांद्रा-वरळी आठ पदरी सागरी मार्ग प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे. या प्रकल्पात दोन केबल स्टेड पुलाचा समावेश असून सदर प्रकल्प डिसेंबर २००७ पर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे.

**डॉ. कोटणीस, गोविंद भाई श्रॉफ व नटसम्राट बालगंधर्व यांची स्मारके.**

८७. दुसऱ्या महायुध्दात चीन मध्ये स्वतःचा जीव धोक्यात घालून रुग्णांची अहर्निश सेवा करणारे सोलापूरचे महान सूपूत्र स्वर्गीय डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे सोलापूर येथे तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अर्ध्वयु व थोर स्वातंत्र्य सेनानी पद्मविभुषण कै. गोविंदभाई श्रॉफ यांच्या नावे औरंगाबाद येथे त्यांच्या किर्तीस साजेसे स्मारक उभारण्यात येईल, या स्मारकासाठी आवश्यक ती तरतुद करण्यांत येत आहे. कै. नारायण श्रीपाद कुलकर्णी उर्फ राजहंस तथा नटसम्राट बालगंधर्व यांचे स्मारक

शासनामार्फत मौ. नागठाणे, ता. पलुस, जि. सांगली येथे करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. याबाबत शासनाला शिफारशी करण्याकरिता मा.पालकमंत्री जिल्हा- सांगली यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीचा सविस्तर अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

**पोलिसदलाचे आधुनिकीकरण.** **८८.१.** सन २०००-०१ पासून पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेवर आतापर्यन्त रुपये ५५६ कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे. २०००-०१ पासून या योजनेंतर्गत पोलीस दलाकरिता सुमारे ४,४५२ नवीन वाहने उपलब्ध करण्यात आलेली आहेत. सन २००५-०६ करिता पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी रुपये १८४.२० कोटी इतक्या निधीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

र

**८८.२.** राज्याच्या २२ सीमावर्ती तपाणी नाक्यावर मोटारवाहन कर व दंड यांच्या वसूलीत वाढ होण्यास्तव इमारत बांधकाम, बजनूपल, रस्तामार्गिका आणि परिवहन आयुक्त, वाहतूक अधिकारी किंवा उप वाहतूक अधिकारी यांची कार्यालये सर्व सीमावर्ती तपासणी नाक्यासोबत संगणकाद्वारे जोडणे यासारख्या पायाभूंत सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. याकरिता अंदाजे रुपये ५० कोटी इतका खर्च अपेक्षित असून सन २००५-०६ करिता सदर प्रयोजनार्थ रुपये ५० लक्ष इतकी तरतूद करण्यात येईल.

**पोलीस कल्याणाच्या सुविधा.** **८९.१.** राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना उपलब्ध असणाऱ्या वैद्यकीय सुविधांमध्ये आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या जीवनमानामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे याची शासनाला खात्री झाली

आहे. तोच उद्देश मनामध्ये ठेवून अनेक प्रकारच्या आजारांवर खाजगी क्षेत्रातील चांगल्या वैद्यकीय सुविधांचा लाभ सर्व स्तरातील पोलीस कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटूंबियांना घेता येणे शक्य व्हावे म्हणून आम्ही त्यासाठी एक योजना लागू करण्याचे प्रस्तावित करीत आहोत. सदर योजनेखालील अनुज्ञेय खर्चाच्या मर्यादाच केवळ वाढविण्यात येणार नसून, अशा खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मागणी साठी सध्या लागू असणारी कार्यपध्दती सुध्दा सुलभ करण्यात येईल.

**८९.२.** सर्व पोलीस अधिकारी त्यांच्या संपूर्ण कर्तव्य कालावधीत शारिरीकदृष्ट्या पात्र/ तंदुरुस्त रहावेत म्हणून ३५ ते ५८ या वयोगटामधील सर्व पोलीस अधिकाऱ्यांसाठी एक प्रोत्साहन योजना लागू करण्याचे माझ्या शासनाने ठरविलेले आहे. सदर योजनेनुसार जे पोलीस अधिकारी शारिरीकदृष्ट्या पात्रतेचे सुस्पष्ट केलेले निकष सातत्याने पूर्ण करतील अशा पोलीस अधिकाऱ्यांना वार्षिक तत्वावर ठोक रकमेची प्रोत्साहने मंजूर केली जातील.

**गव्हर्नन्स.** **९०.१.** एकात्मिक नागरी सुविधा केंद्र सेतु या प्रकल्पांतर्गत सर्व सामान्य जनतेला लागणाऱ्या विविध सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सद्य:स्थितीत २५ जिल्हा मुख्यालयी व २७३ तालुका मुख्यालयी सेतु केंद्र कार्यरत आहेत. या केंद्राद्वारे ८५ विविध प्रकारची प्रमाणपत्रे, परवाना तसेच तक्रारींचे निराकरण इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**९०.२.** राज्यातील ३८६ नोंदणी मुद्रांक कार्यालयामध्ये बांधा, मालकी हक्कासह वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर सरिता या प्रकल्पाद्वारे जलदगतीने दस्त ऐवजांची नोंदणी केली जाते. मालमत्तेचे मुल्यांकन आता ऑन-लाईन शक्य झाले आहे. सहज, समय, सहयोग, शोध, संपर्क, ई-संदेश सारख्या ई- मंत्रा आज्ञावलीचा उपयोग मंत्रालयीन दैनंदिन कामकाजामध्ये करण्यात येत आहे.

**९०.३.** विविध विभागांचे ई-गव्हर्नन्स प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी मंत्रालय ते जिल्हा मुख्यांलये व जिल्हा मुख्यालये ते सर्व तालुका मुख्यालये येथे हायस्पीड ऑप्टीकल फायबर कनेक्टीव्हीटीचे जाळे उभारण्यात येत आहे. तसेच शासनाने मंत्रालयात अत्याधुनिक केंद्रीभूत रचनेचे डेटा सेंटर उभारण्याचे योजलेले आहे. हायस्पीड कनेक्टीव्हीटी व केंद्रीभूत डेटा सेंटर द्वारे यामुळे विविध विभागांचे राज्यस्तरीय संगणकीय प्रकल्प राबविणे शक्य होणार आहे.

**विज्ञान व तंत्रज्ञान.**

**९१.** आर्थिक व सामाजिक विकासासाठी विज्ञान व तंत्रज्ञान हे एक महत्वाचे साधन असूने महाराष्ट्रातील विज्ञान व तंत्रज्ञान कार्यक्रमांना गती देण्यासाठी राज्यात राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. या आयोगासंबंधिचे विधेयक दिनांक १५ डिसेंबर २००४ रोजी पारित करण्यात आलेले आहे. डॉ. वसंत गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग नजिकच्या काळात कार्यरत होईल. सदर आयोगामार्फत पर्यावरण, अन्न प्रक्रिया, आरोग्य, उर्जा संवर्धन, भुगर्भ मापन,

जीन बँक निर्माण, औषधी वनस्पतींचे सर्वेक्षण, पेटंट माहिती केंद्र, विज्ञान केंद्र या सारखे प्रकल्प राबविले जातील. यासाठी २००५-०६ या आर्थिक वर्षात रुपये १ कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा ...ळा.**

९२. मुंबईलगतच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रस्तुत स्मारक उभारणी संबंधात शासनाला शिफारशी व या कामाचे सनियंत्रण करण्याकरीता तांत्रिक समिती व मानसचित्रण समिती अशा दोन समित्या नेमण्यात आल्या आहेत.

**कै. ग. दि. माडगूळकर यांचे स्मारक.**

९३. कै.ग.दि.माडगूळकर यांच्या स्मारकाच्या कामाचा अंतिम आराखडा समितीकडून मंजूर झाला आहे. या कामासाठी निधी उपलब्ध करुन पुढील कामकाज पार पाडण्याबाबत ही समिती प्रयत्नशील आहे.

**राज्यातील वनक्षेत्र.**

९४. महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्राच्या २०.९१ टक्के वनक्षेत्र आहे. सदरील वनक्षेत्र २०१२ पर्यंत ३३ टक्के पर्यन्त वाढविण्याबाबत सर्वंकष प्रयत्न केले जातील. या योजनेकरिता वर्ष २००५-०६ साठी रुपये ७.३० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**वनपर्यटन.**

९५. महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी निसर्ग पर्यटनाची प्रमुख ठिकाणे असून, त्यांच्या विकासाकरिता रुपये ३.३० कोटी इतका

निधी वन विभागाला उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल तसेच पर्यटकांना पर्यटनाच्या संधी उपलब्ध होतील.

**गोरेवाडा येथील इको टुरिझम प्रकल्प.**

**९६.** पर्यटनाला प्रोत्साहन देण्याकरिता नागपूर जवळ गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा इको टुरीझम प्रकल्प तसेच प्राणी, संग्रहालय व सफारी पार्क उभारण्यात येईल. सिंगापूरच्या धर्तीवर या प्रकल्पाची आखणी करण्यात येणार आहे. याकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांची नेमणूक केली जाईल. यामुळे महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर येथे भारतातील तसेच परदेशातील पर्यटक आकर्षित होतील अशी मला खात्री आहे.

**संयुक्त वन व्यवस्थापन.**

**९७.** जंगलांमध्ये बहुतांशी आदिवासी रहात असून, त्यांच्या कुपोषणाचा मोठा प्रश्न महाराष्ट्रापुढे आहे. वनक्षेत्रात कार्य आयोजनाप्रमाणे वन विकासाचा कार्यक्रम घेतला असता, त्यांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांचे अर्थार्जन वाढते. हे लक्षांत घेता संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत विविध योजना हाती घेतल्या जातात व अशा योजनांमध्ये इतर विभागांचा सक्रीय सहभाग होण्याच्या दृष्टीने राज्यात ठोस पावले उचलली जातील. आतापर्यंत राज्यात ३९ वन विकास प्रकल्प मंजूर झाले आहेत. प्रकल्पाचा ५ वर्षाकरिता नियतव्यय रुपये ८९.५९ कोटी आहे.

**वन संरक्षण.**

**९८.** राज्य शासनाने पुढील १० वर्षासाठी वन संरक्षणाचा रुपये ८४.२१ कोटीचा बृहद आराखडा बनविला आहे. आधुनिक वन वणवा प्रतिबंधक प्रकल्प या योजनेची व्याप्ती वाढवून ती

आता एकात्मिक वनसंरक्षण योजना म्हणून राबविण्यात येत आहे. मागील चार वषामध्ये या योजनेसाठी रुपये ६.२३ कोटी अर्थसहाय केंद्र शासनाकडून प्राप्त झाले आहे. सन २००५-०६ साठी रुपये ३० लक्ष नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**गार्मेंट उद्योगासाठी सवलती.** ९९. गार्मेंट उत्पादन उद्योगाची वाढ लक्षात घेता देशातील इतर राज्यांच्या कामगार कायद्याच्या तुलनेत आवश्यक त्या सर्व सवलती देऊन या व्यवसायास पोषक वातावरण निर्माण करण्याची आमची जबाबदारी राहील.

**गारमेंट पार्क.** १००. महाराष्ट्र हे कापड उत्पादन आणि निर्यात क्षेत्रात देशातील एक अग्रेसर राज्य आहे. १ जानेवारी, २००५ पासून नवीन जागतिक व्यापार संघटनेच्या अंतर्गत जागतिक बाजारपेठेमधील कापड व कापडी वस्त्रांमधील कोटा सिस्टीम रद्द झालेली असल्यामुळे या वस्तुंच्या निर्यातीसाठी मोठ्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. अशा बदललेल्या परिस्थितीमध्ये रोजगार निर्माण, उत्पादन व निर्यात यात महत्वपूर्ण वाढीला वाव देण्याच्या दृष्टीने वस्त्रोद्योगाला, विशेषतः कापडावरील प्रक्रिया व तयार कपडे निर्मिती उद्योगाला अधिक प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. या करिता महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या अधिपत्याखालील नरसिंगगिरजी मिल, सोलापूर, शाहू छत्रपती मिल, कोल्हापूर, एम्प्रेस मिल, नागपूर आणि विजय मिल, बडनेरा या चार गिरण्यांकडे भाडेपट्टीवर असलेल्या शासकीय जमिनीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत गारमेंट पार्क उभारण्यात येतील. या गारमेंट पार्कमध्ये खाजगी

उद्योजकांना मूलभूत सोयीसुविधा आणि इतर उपयुक्त सवलती पुरविण्यात येतील.

**असंघटित कामगार.** **१०१.** राज्य शासनाने असंघटीत कामगारांसाठी राज्यस्तरीय प्राधिकरणांची स्थापना केली आहे. तसेच असंघटीत कामगार प्राधिकरण निधी निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. या निधीत राज्य शासनाचे अंशदान रुपये ५ कोटी इतके असेल.

**सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात दुप्पट वाढ.** **१०२.** ग्रंथ व नियतकालिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली आणि इतर खर्चात झालेली वाढ विचारात घेता, तसेच शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयामधील कर्मचाऱ्यांच्या व मोबदल्यात वाढ करता यावी तसेच ग्रंथालयाला अधिक पुस्तके व नियतकालिके घेता यावीत या उद्देशाने ग्रंथालयांच्या सन १९९८-९९ च्या स्तरावरील अनुदानात दुपटीने वाढ करण्याचा निर्णय मार्च २००५ मध्ये घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथ संपत्तीत तसेच अंदाजे १०,००० सेवकांच्या मोबदल्यातही वाढ होईल. सन २००५-०६ या वर्षाकरिता या प्रयोजनार्थ आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

**वैद्यकीय महाविद्यालये.** **१०३.** मराठवाड्यातील लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी सन २००५-०६ या वर्षी रुपये २० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच, औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अतिविशेषोपचार रुग्णालयात

रुपांतर व श्रेणीवर्धनासाठी रुपये १५.४९ कोटी व नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपूरी येथे स्थलांतरित करण्यासाठी रुपये २१.०३ कोटी इतकी रक्कम सन २००५-०६ या वर्षी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**किमान आधारभूत किंमतीने धान्य खरेदी योजना.**

१०४. राज्यातील शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीचा लाभ देण्यासाठी चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यभरात सुमारे ८०० खरेदी केंद्रे उघडण्यात आली. खरेदी हंगामात सुमारे ७.२० लक्ष क्विंटल भात, १.१९ लक्ष क्विंटल ज्वारी व ०.४८ लक्ष क्विंटल बाजरी व १.४८ लक्ष क्विंटल मक्याची खरेदी करण्यात आली आहे. यासाठी राज्य शासनाने चालू वर्षी स्वतःच्या निधीतून सुमारे रुपये ६६ कोटीचा निधी गुंतवून, शेतकऱ्यांना आधारभूत किमतीच्या लाभाची सुनिश्चिती केली आहे.

**गुरु-ता-गद्दीची त्रिशताब्दी.**

१०५. नांदेड येथे होणाऱ्या गुरु-ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळया निमित्ताने भाविकांना पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच विविध विकास कामे करण्यासाठी शासनाने सुमारे रुपये ८१७ कोटी खर्चाच्या कामांचा आराखडा तयार केला आहे. हा सोहळा जरी २००८ मध्ये होणार असला तरी, आतापासूनच पायाभूत सोयी सुविधांची कामे करावी लागणार आहेत. या सोहळयासाठी केंद्र शासनाकडून निधीची मागणी करण्यात आली असून, राज्य शासनाने सन २००५-०६ या वर्षासाठी रुपये १२ कोटी इतकी तरतूद केली आहे.

**रोजगार हमी योजना.** **१०६.१.** राज्यातील टंचाईसदृष्य परिस्थिती असलेल्या जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची आवश्यकतेनुसार कामे सुरु राहण्यास्तव काही निकष शिथिल करण्यात आले आहेत. सन २००४-०५ मध्ये या योजनेंतर्गत ६८,१०९ कामे दिनांक ३१ डिसेंबर २००४ अखेर पूर्ण झाली आहेत व एकूण रुपये १,२१८ कोटी खर्च झाले असुन त्याद्वारे २० कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली आहे. सन २००५-०६ या वर्षाकरिता सदर रोजगार हमी योजनेकरिता रुपये ५७५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१०६.२.** या निधीच्या माध्यमातून राज्याच्या दुष्काळी भागातील शेती शाश्वत पायावर उभी रहावी या हेतूने आगामी वर्षापासून रोजगार हमी निगडीत एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम राबविला जाईल. एकात्मिक नियोजन, लोक सहभाग तथा कालबध्द अंमलबजावणी ही या योजनेची वैशिष्ट्ये राहतील.

**जलदगती न्यायालये.** **१०७.१.** अकराव्या वित्त आयोगाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र राज्याला नेमून दिलेल्या उद्दिष्टानुसार १८७ जलदगती न्यायालये स्थापन झालेली आहेत. या जलदगती न्यायालयांमार्फत जानेवारी २००५ अखेरपर्यंत एकूण ९४,४५५ इतकी दिवाणी व फौजदारी प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

**१०७.२.** केंद्र शासनाने या योजनेकरिता सन २००० ते २००५ या पाच वर्षाकरिता रुपये ४८.३६ कोटी इतका निधी मंजूर केला आहे. त्यापैकी आतापर्यंत रुपये ४३.५२ कोटी

इतका निधी राज्यास उपलब्ध करुन दिला आहे. ही योजना कार्यान्वित करण्याबाबत महाराष्ट्र शासन हे अग्रेसर असून ती यशस्वीपणे कार्यान्वित केल्याबद्दल केंद्र शासनाने व सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनाची विशेष प्रशंसा केली आहे.

**…यालयांची स्थापना.**

**१०८.१.** राज्यात माळशिरस जिल्हा सोलापूर, जयसिंगपूर जिल्हा कोल्हापूर, माजलगांव जिल्हा बिड, उमरगा जिल्हा उस्मानाबाद, अकोट जिल्हा अकोला तसेच बसमतनगर व गंगाखेड जिल्हा परभणी येथे अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधिश व दिवाणी न्यायालये (वरिष्ट स्तर) तसेच राहता जिल्हा अहमदनगर येथे दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग आणि वसई येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) पालघर जिल्हा ठाणे यांचे जोड न्यायालय अशी न्यायालये सन २००४-०५ या वर्षामध्ये स्थापन करण्यात आले असुन, ती कार्यान्वीत झाली आहेत.

**१०८.२.** राज्यातील न्याय व्यवस्था भक्कम करणे तसेच थकीत प्रकरणांची संख्या जलदगतीने कमी करणे यावर राज्य शासनाने भर देण्याची भूमिका स्वीकारली आहे. विधी व न्याय विभागामार्फत न्यायालयांकरिता मूलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे न्यायालयीन इमारती व न्यायाधीश निवासस्थानांच्या बांधकामांसाठी सन १९९३ पासून केंद्र पुरस्कृत योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या हिश्श्याऐवढे अनुदान राज्य शासन उपलब्ध करुन देते. या योजनेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात एकूण ३८ कामे पूर्ण झालेली